cmyk

## संपादकीय

### हक्क असले तरी नैतिकता जरूर पाळावी

विद्यमान सरन्यायाधीश बी. आर. गवई, माजी सरन्यायाधीश संजीव खन्ना, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश अभय ओक यांनी निवृत्तीनंतर आम्ही लगेचच कोणतेही पद घेणार नाही अशी जी स्वत:हून पुढाकार घेत घोषणा केली आहे ती आदर्श मानायला हवी. सगळ्यांनीच याचे अनुकरण करावे असे बंधन कोणावर घालता येणार नाही. मात्र सगळ्यांनी तसे केले तर न्यायपालिकेवरचा विश्वास अधिक दृढ होईल आणि नैतीकतेला प्राधान्य मिळेल.


दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### भारताचा परकीय चलन साठा ६९६ अब्ज डॉलरवर

मुंबई : भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ताज्या आकडेवारीनुसार, देशाचे परकीय चलन साठे (फॉरेक्स रिझर्व्हर्ज) ५.१७ अब्ज डॉलरनी वाढून ६९६.६५६ अब्ज डॉलरवर पोहोचले आहेत. ही रक्कम सप्टेंबर २०२४ मध्ये नोंदवलेल्या सर्वकालीन उच्चांक ७०४.८९ अब्ज डॉलरच्या केवळ १.२ टक्के अंतरावर आहे. त्याआधीच्या आठवड्यात फॉरेक्स रिझर्व्हर्जमध्ये १.२३ अब्ज डॉलरची घट झाली होती. फॉरेक्स रिझर्व्हर्जचा प्रमुख घटक असलेल्या परकीय चलन मालमत्तेमध्ये ३.४७२ अब्जने वाढ झाली असून ती ५८७.६८७ अब्ज डॉलर झाली आहे. ही वाढ आंतरराष्ट्रीय चलनांच्या मूल्यात होणाऱ्या बदलांमुळे झाली आहे. सोने साठा १.५८३ अब्ज डॉलरने वाढून ८५.८८८ अब्ज डॉलरवर पोहोचला आहे.


बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–५१ | शनिवार, दि.१४ जुन २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


# शेतकरी कर्जमाफीच्या आशा वाढल्या!

## बच्चू कडूंच्या आंदोलनाला यश; राज्य सरकार समिती स्थापन करणार





अमरावती | पतिनिधी

बच्चू कडू यांची प्रकृती खालावली असून त्यांना रक्ताच्या उलट्या झाल्या आहेत. मात्र तरिही उपचार घेण्यास बच्चू कडू यांनी नकार दिला आहे. दरम्यान सरकारच्या वतीने महसुल मंत्री चंद्रशेखर बावन्नकुळे यांनी शुक्रवारी बच्चू कडूंची भेट घेऊन मुख्यमंत्र्यांशी त्यांचे बोलणे करुन दिले. राज्य सरकार शेतकरी कर्जमाफीसाठी समिती स्थापन करणार असून समितीचा अहवाल आल्यावर शेतकरी कर्जमाफी केली जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितल्याचे बावन्नकुळे यांनी म्हटले आहे. त्यामुळे शेतकरी कर्जमाफिच्या आशा आता वाढल्या आहेत. पान २ वर

### बच्चू कडूंनी सांगितली सरकारसोबतची चर्चा

आंदोलनस्थळी बच्चू कडू यांच्याशी चर्चा करण्यासाठी अमरावतीचे पालकमंत्री आणि राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आले होते. बावनकुळे यांच्यासोबत नेमकी काय चर्चा झाली? याबाबतची माहिती बच्चू कडू यांनी दिली आहे. दिव्यांगांना ६ हजार रुपये मानधन संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासोबत चर्चा झाली. यासंदर्भात पुरवणी काढण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले आहे. इतर १७ मागण्या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासोबत बैठक होईल असे कडू यांनी सांगितले.

### बच्चू कडू यांच्या आंदोलनाला मनसेचा पाठिंबा

अमरावती–बच्चू कडू यांच्या आंदोलनाला आमच्या मनसे पक्षाचा पाठिंबा आहे, अशी प्रतिक्रिया प्रकाश महाजन यांनी दिली. प्रकाश महाजन यांनी बच्चू कडूंची भेट घेतली आहे.

### बच्चू कडू उपोषणावर ठाम; आज बैठकीत निर्णय

दरम्यान शनिवारी दुपारी दोन वाजता उपोषण सुरू ठेवायचं की नाही यावर बच्चू कडू हे निर्णय घेणार आहेत. सकाळी ११ वाजता उपोषण स्थळी शेतकरी आणि प्रहार कार्यकर्त्यांची बैठक बोलावण्यात आली आहे. तसेच शनिवारी मंत्री उदय सामंत हे देखील बच्चू कडू यांची भेट घेणार आहेत.

## शेतकऱ्यांना योग्यवेळी कर्जमाफी दिली जाईल !

### अजित पवार यांचे आशादायी संकेत



अकोला : राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार नाही, असे सरकारने कधीही म्हटलेले नाही. योग्य वेळी शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली जाईल,'' असे स्पष्ट संकेत राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत.

अकोला दौऱ्यावर आले असता त्यांनी अकोला, वाशीम जिल्ह्यांच्या विकासाचा संयुक्त आढावा घेतला. यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. या वेळी राज्यमंत्री इंद्रनिल नाईक, आमदार संजय खोडके, आमदार अमोल मिटकरी, आमदार किरण सरनाईक यांची उपस्थिती होती. ते म्हणाले, की आजच्या बैठकीत अकोला, वाशीम जिल्ह्यातील जिल्हा नियोजन समितीच्या निधी खर्चाचा आढावा घेतला. गेल्या वेळी ९० टक्केच म्हणजे २७० कोटींचा खर्च झाला, असे होणे योग्य नाही. वेळेत खर्च व्हायला हवा होता. त्यात चुका दिसत आहेत. समन्वय नसल्याचे दिसते. पण यावर्षीचा निधी कुठल्याही परिस्थितीत वेळेत खर्च व्हावा अशा स्पष्ट सूचना यंत्रणांना दिल्या आहेत. बैठकीत केंद्र व राज्याच्या योजनांचाही आढावा घेतला. राज्य सरकार स्थापन झाल्यानंतर १०० दिवसांचा कृती कार्यक्रम यंत्रणांना देण्यात आला होता. त्याचाही आढावा घेतला. पान २ वर

### १५ जूनला राज्यभरात चक्काजाम आंदोलन–जरांगे

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी देखील काल बच्चू कडू यांची भेट घेतली होती. मनोज जरांगे पाटील यांनीही कडू यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. तसेच आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी राज्यभरामध्ये १५ जूनला चक्काजाम आंदोलन करण्याचा निर्णय झाल्याची माहिती मनोज जरांगे पाटील यांनी दिली आहे.

## थोडक्यात...

### प्रभाग रचनेवर जितेंद्र आव्हाड यांची जहरी टीका

मुंबई–निवडणूक आयोगाचे अधिकाऱ्यांना घरी बोलावून इथले राजकीय नेते प्रभाग रचना करतात अशी टीका राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी केली आहे.

### सोने–चांदीच्या दरात मोठी वाढ

मुंबई–सराफ बाजारात सोन्या आणि चांदीच्या दराने मोठी उसळी घेतली आहे. गेल्या २४ तासात सोन्या आणि चांदीच्या दरात मोठी वाढ झाली आहे. सोन्याचे दरात तब्बल २ हजार ४०० तर चांदीच्या दरात १ हजार रुपयांची वाढ झाली आहे.

### शनि देवस्थानातील १६७ कर्मचाऱ्यांना नारळ

शनी शिंगनापूर : शनि शिंगणापूर देवस्थानातील १६७ कर्मचाऱ्यांना कामावरुन काढून टाकण्यात आले असून या कर्मयाऱ्यांमध्ये १४४ मुस्लीम कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. अनियमितता तसंच शिस्तीचे पालन न केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे.

### थायलंडमध्ये एअर इंडिया विमानाचे इमर्जन्सी लँडिंग

नवी दिल्ली : थायलंडमध्ये एअर इंडिया विमानाचे इमरजन्सी लँडिंग करण्यात आले आहे. बॉम्बच्या धमकीमुळे हे इमरजन्सी लँडिंग करण्यात आले. फुकेतहून दिल्लीला येणाऱ्या विमानात १५६ प्रवासी होते. सर्व प्रवासी सुखरुप आहेत.

### करिश्मा कपूरच्या पुर्वाश्रमीच्या पतीचे निधन

मुंबई : बॉलीवूड अभिनेत्री करिश्मा कपूरचे पूर्वाश्रमीचे पती आणि उद्योजक संजय कपूर यांचं निधन झाले आहे. वयाच्या ५३ व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले आहे. पोलो खेळत असताना त्यांच्या तोंडात मधमाशी गेली आणि मधमाशीने त्यांना चावा घेतला, त्यामुळे त्यांना श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. त्यातच त्यांना हृदयविकाराचा झटका येऊन त्यात त्यांचे निधन झाले.

### पालिका निवडणुका डिसेंबर, जानेवारीत?

मुंबई : अगामी पालिका निवडणुकीसाठी नगरविकास विभागाने प्रभाग रचना हद्द निश्चितीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्याअनुषंगाने ४ सप्टेंबरपर्यंत प्रभाग रचना अंतिम केल्यानंतर आरक्षण, मतदार यादी अंतिम करण्याच्या प्रशासकीय बाबी पूर्ण करण्यासाठी ऑक्टोबरपर्यंत मुदत दिली आहे. त्यानंतर निवडणुकांची तारीख घोषित होईल. प्रशासकीय कार्यक्रमाची आखणी लक्षात घेता डिसेंबर २०२५ अखेर किंवा जानेवारी २०२६च्या पहिल्या आठवड्यात निवडणुका जाहीर होतील, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

# दुर्घटनाग्रस्त विमानाचा ब्लॅक बॉक्स सापडला

## पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जखमींची घेतली भेट; घटनास्थळाची केली पाहणी



अहमदाबाद | प्रतिनिधी

दुर्घटनाग्रस्त विमानाचा ब्लॅक बॉक्स सापडला असून या ब्लॅक बॉक्समुळे विमान अपघाताचे गूढ उलगडणार आहे. दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेतील जखमींची रुग्णालयात जावून भेट घेतली असून घटनास्थळी जावून पाहणी देखील केली आहे.

जेव्हा एखादे विमान कुठेही कोसळते, तेव्हा प्रथम अपघाताचे कारण शोधले जाते. विमान अपघात झाल्यानंतर लगेचच स्थानिक प्रशासन, पान २ वर

### विमान चुकले अन् भुमी चौहान वाचल्या

ज्या विमानाचा अपघात झाला त्या विमानाने भुमी चौहान या लंडनला जाणार होत्या. मात्र १० मिनिटे उशिर झाल्याने विमान चुकले. पुढे त्याच विमानाचा अपघात झाला. लेट झाल्याने भूमी चौहान वाचल्या आहेत.

### विमान दुर्घटनेवेळी मला काहीच कळले नाही– रमेश विश्वासकुमार

विमान दुर्घटनेतून रमेश विश्वासकुमार हा आश्चर्यकारकरित्या बचावला आहे. या दुर्घटनेत कसा बचावला हे खुद्द रमेश विश्वासकुमारनेच सांगितले असून मी विमानातून उडी मारली नाही असे म्हणत दुर्घटनेवेळी काहीच कळले नसल्याचेही त्याने सांगितले आहे.

### मृतांचा आकडा २६५वर

एअर इंडियाच्या विमान अपघातात आतापर्यंत २६५ जणांचा मृत्यू झाला आहे. अहमदाबादचे पोलीस उपायुक्त कानन देसाई यांनी ही माहिती दिती आहे.

# इम्तियाज जलील यांच्यावर ॲट्रॉसिटी



छ.संभाजीनगर | प्रतिनिधी

संजय शिरसाट यांच्यावर औद्योगिक वसाहतीमधील जमिनीवरून आरोप करताना एका समाजाविषयी वादग्रस्त वक्तव्य केल्याच्या तक्रारीवरून माजी खासदार इम्तियाज जलील यांच्यावर क्रांती चौक पोलिस ठाण्यात अट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वास्तविक पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या विरोधात माजी खासदार इम्तियाज जलील यांनी अनेक पुरावे गोळा केले आहेत. त्यानंतर त्यांनी पत्रकार परिषद घेत शिरसाट यांच्यावर गंभीर आरोप देखील केले. मात्र, यातच औद्योगिक वसाहतीमधील जमिनीवरून आरोप करताना एका समाजाविषयी वादग्रस्त वक्तव्य केले असल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्यांच्या याच वक्तव्यावरुन आता त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला असल्याचे वृत्त समोर आले आहे. पान २ वर

## नवीन प्रभाग रचना रद्द करण्यासाठी हायकोर्टात याचिका

मुंबई | प्रतिनिधी

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचे पडघम वाजत आहेत. सर्वोच्च न्यायालयानेच या प्रकरणात निर्देश दिल्याने निवडणूक आयोग कामाला लागला आहे. लातूर जिल्ह्यातील औसाचे माजी नगराध्यक्ष अफसर शेख यांनी एका महत्त्वाच्या विषयाला हात घातला आहे. त्यांनी नवीन प्रभाग रचना रद्द करण्यासाठी दंड थोपटले आहेत.

त्यांनी नवीन प्रभार रचना रद्द करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली. या याचिकेवर न्या. नितीन डब्ल्यू. सांबरे आणि न्या. सचिन एस. देशमुख यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. कोर्टाने राज्य निवडणूक आयोगासह राज्य सरकारला नोटीस बजावली. याचिकेवर १९ जून रोजी पुढील सुनावणी होणार आहे.

औसा येथील माजी नगराध्यक्ष अफसर शेख यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेत राज्य पान २ वर

## इस्त्रायलकडून इराणच्या अणुसंवर्धनच्या मुख्य गाभ्यावर हल्ला !

### इराणचे लष्करप्रमुख मोहम्मद बघेरी, हुसेन सलामी ठार; इराणचाही इस्त्रायलवर क्षेपणास्त्र हल्ला



तेहरान | वृत्तसंस्था

शुक्रवारी इस्त्रायलने इराणच्या अण्वस्त्रांच्या ठिकाणावर हल्ला केला, ज्यामुळे दीर्घकालीन प्रादेशिक प्रतिस्पर्ध्यांमध्ये संभाव्य सर्वांगीण युद्धाची भीती निर्माण झाली. या हल्ल्यात इराणचे लष्करप्रमुख मोहम्मद बघेरी आणि रिव्होल्यूशनरी गार्ड्सचे कमांडर-इन-चीफ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१३ जुन २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६०.५० क्विंटल | १,८७१ | २,७०० | २,४५० |
| ज्वारी/हायब्रिड : ५०.५० क्विंटल | १,८०० | २,५३५ | २,३५४ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,२०० | २,२०० | २,२०० |
| तूर : १५.०० क्विंटल | ५,८०० | ६,००० | ५,९३३ |
| उडीद : १.०० क्विंटल | ४,५०० | ४,५०० | ४,५०० |
| बाजरी:७.५० क्विंटल | १,७०० | २,४५० | २,१८० |
| मुग :१.५० क्विंटल | ६,००० | ६,००० | ६,००० |
| सोयाबीन:२.०० क्विंटल | ४,१०० | ४,२०० | ४,१५० |
| हरभरा: २८.५० क्विंटल | ५,०३१ | ५,३५१ | ५,२२४ |

# धनंजय मुंडेंच्या राष्ट्रवादी भवन भेटीस तुफान गर्दी

## पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांची कामे मार्गी लावण्यात धनंजय मुंडे ४ तास रमले

बीड | प्रतिनिधी

राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते तथा माजी मंत्री आ धनंजय मुंडे आता पुन्हा एकदा कामकाजात कमालीचे सक्रिय झाले असून आज त्यांनी बीड येथील राष्ट्रवादी कॉंग्रेस भवन येथे जनता संवाद उपक्रमास उपस्थित राहून पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी व कामे समजून घेतली.



यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस भवनचा संपूर्ण परिसर कार्यकर्ते व नागरिकांनी तुडुंब भरून गेला होता.

पक्षातील विविध पदाधिकारी कार्यकर्ते त्याचबरोबर आलेल्या नागरिकांची कामे मार्गी लावण्यामध्ये धनंजय मुंडे हे तब्बल चार तास रमले होते. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष ॲड राजेश्वर आबा चव्हाण, माजी आमदार संजय भाऊ दौंड, ओबीसी आघाडीचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे, समता परिषदेचे ॲड सुभाष राऊत, डॉ योगेश क्षीरसागर, बबन गवते, अमर नाईकवाडे, फारुख पटेल, मोईन मास्टर, अविनाश नाईकवाडे यांसह विविध आघाडी, फ्रंटल सेलचे अध्यक्ष, पदाधिकारी आदी उपस्थित होते.

cmyk

## अग्रलेख

# प्रत्येक शक्यता गृहित धरुनच सुरक्षा आखावी

अहमदाबादहून लंडनला निघालेल्या एअर इंडियाच्या बोईंग ७८७ प्रवासी विमानाला भीषण अपघात होऊन ते कोसळल्याने त्यातील प्रवाशांचा दु:खद अंत झाल्याचे वृत्त मनाला यातना देणारे आहे. या अपघातात प्रवाशांसह २६५ जणांचा मृत्यू झाला आहे, यात प्रवासी आणि ज्याठिकाणी विमान कोसळले त्या मेडीकल कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

१९९६ नंतरची ही अशा प्रकारची पहिलीच मोठ्या हानीची दुर्घटना आहे. हे विमान विमातळाजवळच्या नागरी वस्तीत कोसळल्यामुळे या दुर्घटनेची तीव्रता अधिकच वाढली. विमान कोसळण्यापूर्वी नजीकच्या वैद्यकीय महाविद्यालयाच्या वसतीगृहाच्या भिंतीला आदळले. त्यामुळे या वसतीगृहाच्या भोजन कक्षात असलेले अनेक वैद्यकीय विद्यार्थी आणि डॉक्टरांवरही काळाची कुऱ्हाड कोसळली. दुर्घटनेच्या चौकशीचा आदेश देण्यात आला आहे. प्रथमदर्शनी हा अपघातच आहे, असे दिसून येत असले तरी, घातपाताची शक्यता पूर्णत: नाकारता येईल काय, असा प्रश्न अनेकांनी उपस्थित केला आहे. चौकशीत सारे काही स्पष्ट होणारच आहे. त्यामुळे चौकशीचा निष्कर्ष हाती येईपर्यंत यावर टिप्पणी करणे योग्य ठरणार नाही. तथापि, नुकताच पहलगाम येथे क्रूर दहशतवादी हल्ला झाला होता. त्यानंतर भारताने त्याचा पुरेपूर बदलाही 'सिंदूर' अभियानाच्या माध्यमातून घेतला होता. पाकिस्तानला या अभियानातून जबर दणका देण्यात आला आहे. त्या देशाचा कुरापतखोर स्वभाव पाहता तो देश मिळालेल्या दणक्यातून धडा घेऊन स्वस्थ बसणारा नाही, हे स्पष्ट आहे. या पार्श्वभूमीवर हा विमान अपघात घडल्याने, कदाचित हा घातपात असावा काय, अशी शंका काहींच्या मनात उपस्थित झाली असावी. अर्थात, कोणत्याही अशा गंभीर दुर्घटनेचा तपास सर्व शक्यता गृहित धरुनच केला जातो. त्यामुळे तो पूर्ण होईपर्यंत प्रतीक्षा करावी लागणार आहे.

तथापि, या दुर्घटनेमुळे काही महत्त्वाचे प्रश्न निश्चितच निर्माण होतात. ते विमान प्रवासाच्या सुरक्षेसंबंधी आहेत. प्रवासी विमानांचे तातडीने लँडिंग होण्याच्या घटनांची वृत्ते अनेकदा दिली जातात. अशा घटना या सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटी दर्शविणाऱ्या असतात, असे मानले जाते. असे अपघात बहुतेक सर्व देशांमध्ये कधीना कधी झालेले आहेत. त्यामुळे अशा त्रुटी भारतातच असतात असे म्हणता येणार नाही. तथापि, अलीकडच्या काळात विमान प्रवासाचे प्रमाण वाढले आहे. एकेकाळी केवळ मोजके धनाढ्या लोकच विमानाने प्रवास करु शकत. उच्च मध्यमवर्गीयांच्याही आर्थिक मर्यादेबाहेरही ही बाब होती. तथापि, गेल्या तीन दशकांमध्ये भारतात नागरी विमानवाहतूक व्यवसायाची अनेक पटींनी वाढ झाली आहे. त्यामुळे आज मध्यमवर्गियांसाठीही विमान प्रवास हे अप्रूप राहिलेले नाही. अशा स्थितीत विमान प्रवासाच्या सुरक्षेसंबंधी प्रशासनाने अधिक जागृत आणि सजग राहण्याची आवश्यकता अधोरेखित करणारी ही दुर्घटना आहे. या दुर्घटनेमुळे आणखी एक महत्त्वाची वस्तुस्थिती समोर आली आहे. ही वस्तुस्थिती मात्र, भारताच्या संदर्भात इतर देशांच्या मानाने अधिक दाहक आहे. आपल्याकडे विमानतळांजवळच नागरी वस्ती असते. त्यामुळे उड्डाण केल्यानंतर अल्पावधीत विमान कोसळल्यास ते नागरी वस्तीवर कोसळण्याची शक्यता दाट असते. अशा स्थितीत अशा नागरी वस्तीतील माणसेही दुर्घटनांमध्ये बळी पडू शकतात. मोठ्या आंतरराष्ट्रीय विमानतळांच्या जवळ मानवी वस्ती असण्याचा प्रकार भारतातच अधिक प्रमाणात आढळतो. या दुर्घटनेतही विमान नागरी वस्तीवर कोसळल्याने अधिक मोठ्या प्रमाणात जीवीतहानी झाल्याचे दिसून येते. त्यामुळे विमानतळांच्या जवळ नागरी वस्तीसाठी अनुमती देण्यासंबंधी प्रशासनाने पुनर्विचार करावयास हवा. विमान दुर्घटना नेहमी घडत नसल्या, तरी जेव्हा घडतात, तेव्हा त्यांच्यामुळे होणाऱ्या हानीचे प्रमाण मोठे असते. त्यामुळे प्रत्येक शक्यता गृहित धरुनच सुरक्षेसंबंधी विचार करण्यात आला पाहिजे.

विमानतळांच्या जवळ नागरी वस्ती असल्याचे दुष्परिणाम कसे होतात, हे या दुर्घटनेतून स्पष्ट झाल्याने यापुढे तरी शहर नियोजन करताना या बाबीचा विचार होण्याची आवश्यकता आहे. दुर्घटनाग्रस्त विमानाचा नियंत्रण कक्षाशी संपर्क तुटला होता असे प्रथमदर्शनी अनुमान या विमान दुर्घटनेसंबंधात काढण्यात आले आहे. संपर्क का तुटला, याची कारणे तपासाअंती स्पष्ट होतीलच. पण असे पुन्हा घडू नये, यासाठी तपास पारदर्शीपणे करुन नेमक्या चुका काय झाल्या आणि त्यांचे उत्तरदायित्व कोणाचे, हे स्पष्ट होण्याची आवश्यकता आहे. बऱ्याचदा मोठे अपघात झाल्यानंतर प्रारंभी मोठी हालचाल केली जाते. पण नंतर प्रकरण साऱ्यांच्या विस्मृतीत जाते आणि पुन्हा तशी गंभीर घटना घडेपर्यंत ते विस्मृतीतच राहते. दुर्घटना घडण्याची कारणे अनेक असतात. तांत्रिक बिघाड, मानवी चूक, नैसर्गिक परिस्थिती अनुकूल नसणे, हेतुपुरस्सर पेले गेलेले दुर्लक्ष किंवा कारस्थान अशा अनेक कारणांमुळे दुर्घटना घडू शकते. यांमधील काही कारणे माणसाच्या हातात असतात तर काही बाबी हातात नसतातही. पण जे घडले आहे, त्याचा योग्य तपास करुन पुढे ती चूक टाळण्याची कृती तर निश्चितच करता येते. तसे यावेळी करण्यात आले तरी तीही एक सकारात्मक बाबच ठरणार आहे. मात्र, यासाठी वस्तुनिष्ठ दृष्टीकोनातून घटनेकडे पहावयास हवे. तसेच तिचे राजकारण करण्याचा मोहही टाळावयास हवा. केवळ एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप केल्याने किंवा जबाबदारी ढकलण्याचा प्रयत्न केल्याने तात्पुरती सोय होऊ शकेल. पण त्यामुळे समस्येवर तोडगा निघू शकत नाही. आपल्याकडे राजकारण हे इतके संवेदनशील आणि स्पर्धात्मक झाले आहे, की कोणत्याही घटनेला राजकीय रंग देण्याची वृत्ती टाळणे कित्येकांना कठीण जाते. तसे न करता या घटनेचा तपास आणि नंतरची कृती झाल्यास ते व्यापक हितासाठी योग्य ठरेल.

# शिक्षण हीच खरी संपत्ती जी कधीच नष्ट होत नाही-आ.लोणीकर

जालना । प्रतिनिधी

**शिक्षण हा मानवी जीवनाचा आधारस्तंभ आहे. तो व्यक्तीला सक्षम बनवतो, समाजाला प्रगतीपथावर नेत असतो आणि राष्ट्राच्या विकासाला गती देतो. शिक्षणाशिवाय प्रगती अशक्य आहे, आणि म्हणूनच प्रत्येक व्यक्तीला शिक्षणाचा हक्क मिळायलाच हवा. या विचाराला केंद्रस्थानी ठेवून, विघ्नहर्ता सेवाभावी संस्था संचलित व्हिजन हॅली पब्लिक स्कूल चा शुभारंभ सोहळा आष्टी येथे संपन्न झाला. या सोहळ्याचे उद्घाटन आ. बबनराव लोणीकर यांच्या हस्ते झाले. यावेळी विद्यार्थी, पालक, स्थानिक नागरिक आणि मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.**



उद्घाटन सोहळ्यात उपस्थित विद्यार्थ्यांना आणि पालकांना मार्गदर्शन करताना आमदार बबनराव लोणीकर यांनी शिक्षणाचे सामाजिक आणि वैयक्तिक जीवनातील महत्त्व विशद केले. ते म्हणाले, ''शिक्षण हीच खरी संपत्ती आहे, जी कधीच नष्ट होत नाही. ती माणसाला आत्मनिर्भर बनवते आणि समाजाला प्रगतीच्या शिखरावर नेऊन ठेवते.''त्यांनी विद्यार्थ्यांना जीवनात यशस्वी होण्यासाठी निश्चित ध्येय, ठाम निर्धार आणि सतत प्रयत्न यांची गरज असल्याचे सांगितले. जीवनात अडचणी आणि आव्हाने ही येतच राहतात, परंतु त्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी संयम, मेहनत आणि निष्ठेची आवश्यकता असते. ''वादळे उठतील, पण झुंजत राहा. किनाऱ्याकडे लक्ष ठेवून नाव हाकत राहा. यश तुमचेच आहे,'' असे प्रेरणादायी उद्गार त्यांनी काढले. त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की, सुख, शांती आणि समृद्धी ही यशातच दडलेली असते. त्यासाठी निष्ठा, मेहनत आणि कर्मकुशलता यांची एक अशी उंच शिडी तयार करा की, ती असीम आकाशालाही स्पर्श करेल. लोणीकर यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजात सकारात्मक बदल घडवण्याचा संदेश दिला. त्यांनी विघ्नहर्ता सेवाभावी संस्थेच्या या उपक्रमाचे कौतुक केले आणि अशा शैक्षणिक संस्थांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची संधी मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. त्यांनी शिक्षक आणि पालकांना आवाहन केले की, मुलांना केवळ पुस्तकी ज्ञानच नव्हे, तर मूल्यनिष्ठ आणि संस्कारयुक्त शिक्षण देऊन त्यांना सज्जन नागरिक बनवावे. विघ्नहर्ता सेवाभावी संस्था संचलित व्हिजन हॅली पब्लिक स्कूलच्या या शुभारंभाने आष्टी आणि परतूर परिसरात शिक्षणाच्या क्षेत्रात एक नवीन अध्याय सुरू झाला आहे. या शाळेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक आणि दर्जेदार शिक्षण उपलब्ध होणार आहे. शाळेच्या उद्घाटनाने स्थानिक समुदायात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, यामुळे शिक्षणाच्या नव्या संधी उपलब्ध होतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# घरकुल योजना ;जिल्ह्यात गेवराई तालुक्याचे काम सर्वात मागे
## योजना राबविण्यासाठी गेवराई गटविकास अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

बीड । प्रतिनिधी

**राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री यांनी दिवाळीपर्यंत घरकुलांच्या लाभार्थ्यांची स्वप्नपूर्ती व्हावी, यासाठी कसोशीने प्रयत्न व्हावेत. यासाठी काम करण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी बीड येथील डीपीसीच्या आढावा बैठकीत सूचना दिल्या आहेत. जिल्ह्यात घरकुलाचे काम प्रगतीपथावर असताना जिल्ह्यातील ११ तालुक्यात सर्वात कमी काम गेवराई आणि त्या खालोखाल बीडचे आहे. त्यामुळे गेवराईच्या गटविकास अधिकारी घरकुल योजना राबविण्यासाठी दुर्लक्ष करत असल्याचे दिसून आले.**

बीड जिल्ह्यात सन २०१६-१७ ते २१-२२ या वर्षात एकूण ३४,२३९ घरकुलापैकी ३१३२ घरकुले पूर्ण करण्यात आली आहे एकूण ९१.५४ टक्के उद्दिष्ट पूर्ण झाले आहे. तर दुसऱ्या टप्प्यात सन २०२४- २५ मध्ये एकूण ८०, ३३३ दिवाळीपर्यंत ७५, ५०५ घरकुले पूर्ण करण्यात येणार आहेत. आतापर्यंत मराठवाड्यात बीड जिल्हा अव्वलस्थानी आहे. जिल्ह्यात तालुकानिहाय उद्दिष्ट पुढील प्रमाणे देण्यात आले आहे. अंबाजोगाई ७,१७३, आष्टी ९,६११, बीड १२,५४०, धारूर ४,९७९, गेवराई १२,३२६, केज ९, २१०, माजलगाव ७,२९९, परळी ६,२१३, पाटोदा ४२५६, शिरूर (कासार) ३,९३३, वडवणी २,७५६ एकूण ८०,२९७, उद्दिष्ट आहे. आतापर्यंत पहिला हप्ता ३७,३०६ लाभार्थ्यांना तर दुसऱ्या हप्त्याची २९३४५ लाभार्थ्यांना वाटप करण्यात आली आहे. जिल्हास्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालिका संगीतादेवी पाटील आणि त्यांचे सहकारी अधिकारी, कर्मचाऱ्यांनी उद्दिष्ट पूर्तीसाठीचे नियोजन केले आहे. तालुकास्तरावर घरकुलाचे उद्दिष्ट प्रदेशासाठी गटविकास अधिकारी यांनी, सरपंच, ग्रामविकास अधिकारी यांच्या मार्फत प्रामाणिक प्रयत्न केल्यासच विहित कालावधीत उद्दिष्टपूर्ती होईल, यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी बीडीओंना कामाला लावणे गरजेचे आहे. सर्वात कमी उद्दिष्ट्य गेवराई आणि त्या खालोखाल बीड तालुक्याचे काम कमी आहे. गेवराईच्या गटविकास अधिकारी श्रीमती कांबळे यांच्या दुर्लक्षामुळे घरकुलाबरोबर अन्य काही योजना आणि उपक्रम राबविण्यासाठी गेवराईच्या गटविकास अधिकारी कमी पडत असल्याची तक्रार करण्यात आली आहे.

# रक्तदान हेच श्रेष्ठ दान-डिगांबर बोराडे

जालना । प्रतिनिधी

**आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त मंठा युवा सेनेच्या वतीने भव्य रक्तदान शिबिर करण्यात आले युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांचा दरवर्षी वाढदिवस महाराष्ट्र राज्यात विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा केला जातो. याच हेतूने आज मंठा युवा सेनेच्या वतीने एम एस ई बी हनुमान मंदिर या ठिकाणी (ता.१३ ) शुक्रवार रोजी भव्य रक्तदान शिबिर येथे संपन्न झाले.**

यावेळी युवासेना तालुका प्रमुख डिगांबर बोराडे, युवासेना शहर प्रमुख गोपी गायकवाड ,वझीर पठाण,गोपाल खंदारे,योगेश बोराडे,पवन बोराडे,मनिष बोराडे,लक्ष्मण टोम्पे,बाळु गवळु,कुलदीप बोराडे,बाबा बोराडे,विष्णु बहाड,बाळासाहेब टाके भागवत चव्हाण यांच्यासह आदी युवासेनिक उपस्थित होते. या वेळी लोकमान्य ब्लड बँक च्या डॉक्टर कर्मचाऱ्यांनी रक्तदात्यांचे रक्त संकलन केले. यावेळी पुढे बोलताना डिगांबर बोराडे म्हणाले की एखाद्या अपघातग्रस्त व्यक्तीला, गरोदर महिलेला, कॅन्सर किंवा थॅलेसेमिया रुग्णाला जिवंत राहण्यासाठी रक्ताची गरज असते. अशा वेळी, आपण दिलेले काही थेंब रक्त एखाद्याचे संपूर्ण जीवन वाचवू शकते. याहून मोठे पुण्याचे काम दुसरे कुठले नाही. रक्तदान करताना कोणतीही शारीरिक हानी होत नाही. आरोग्यदृष्ट्या योग्य असलेल्या १८ ते ६५ वयोगटातील प्रत्येक व्यक्ती दर ३ महिन्यांनी रक्तदान करू शकतो. यामुळे आपल्या आरोग्यावर कोणताही वाईट परिणाम होत नाही, उलट शरीर नव्या रक्तनिर्मितीस प्रवृत्त होते. आपल्या देशात रोज हजारो रुग्णांना रक्ताची गरज भासते. पण त्याच्या तुलनेत रक्तदात्यांची संख्या खूपच कमी आहे. त्यामुळे समाजात रक्तदानाविषयी जागृती करणे ही आपली सामूहिक जबाबदारी असल्याचे डिगांबर बोराडे म्हणाले.

# गुणवंत विद्यार्थ्यांने देश हिताकरिता राजकारणात यावे- विनायक चोथे

अंबड । प्रतिनिधी

**गुणवंत विद्यार्थ्यांनी केवळ मेडिकल इंजिनिरींग यासारख्या क्षेत्रात गुणवत्ता सिद्ध न करता राजकीय क्षेत्रात येऊन देशाहिताकरिता योगदान द्यावे असे प्रतिपादन मराठवाडा विभागीय युवासेना सचिव व स्वामी रामानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक श्री. विनायक चोथे यांनी अंबड येथील स्वामी समर्थ मंदिर सभागृहात आयोजित अंबड तालुका १० व १२ विच्या गुणवंताच्या गुणगौरव व सत्कार समारंभाच्या प्रसंगी केले. सदरील कार्यक्रमाचे आयोजन मा. आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने शिवसेना-युवासेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व स्वामी रामानंद शिक्षण प्रसारक मंडळ शहागड यांच्या सयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. पुढे बोलतांना श्री चोथे म्हणाले कि राजकारणात गुणवंतानी सहभाग घेतला तर देशाची प्रगती उचावेल व राजकीय दिशेला पण एक नवीन वळण मिळेल. मा. ठाकरे यांच्या प्रेरणेतून आम्ही पण राजकरणातून समाजकार्य करण्याकरिता प्रेरित झालो असून आपण आपल्या आईवडीलाच्या कष्टातून प्रेरणा घेऊन त्यांची मान समाजात उंचावेल असे कार्य करावे. वयाच्या १८ ते २८ या काळात आपण सर्व आईवडीलांच्या प्रति असलेली कर्तव्य व जबाबदाऱ्या योग्यरीतीने पार पाडल्या पहिजे. केवळ गुणांच्या टक्केवारी वर यशाचे स्वरूप न ठरवता ज्या क्षेत्रात गेलात त्या क्षेत्रात जबाबदारी व ध्येयाने वाटचाल केली पाहिजे असे त्यांनी सांगितले.**




या कार्यक्रमात अंबड तालुक्यातील १४२ गुणवंताचा गुणगौरव व सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे आयोजक विनायक चोथे, त्याच प्रमाणे उपस्थितीमध्ये भानुदास घुगे, हुनमान धांडे, पंडित गावडे, श्रीमंत खटके, बंडूकाका पागिरे,दिनेश काकडे, कल्याण टकले, कुमार रुपवते, राम लांडे, नंदकिशोर पुंड,सिद्धू जऱ्हाड, गोपाल जवळकर, सुरेश जगताप,विष्णू देवडे, विजय कोठाडे,सतीश धुपे, मुकुंद हुसे, अनिस तांबोळी,सुदाम काळे, गणेश मुळे, बाळासाहेब गावडे, अभिजीत खटके, गणेश गायकवाड, गोकुळ बारवाल, गौतम खरात, लक्ष्मण काकडे, बाळासाहेब तारडे, अमोल टोपे, शाम राठोड, कल्याण टकले, अनिरुद्ध भागवत आदी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. मारोती घुगे यांनी केले तर प्रास्ताविक इजाज शेख यांनी केले यावेळी कु. शिवाजली घुगे, शिवकन्या बिन्नीवाले व मिसबाह पटेल या विद्यार्थीनी मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. सुनील सामग यांनी केले तर सदरील कार्यक्रमास जगन दुर्गे, महेश गोडबोले, संतोष वाघ, भगवान मिरकड, एकनाथ मिटकर, एजाज शेख आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी स्वामी रामानंद शिक्षण प्रसारक मंडळातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, युवासैनिकांनी परिश्रम घेतले.

# पालकमंत्री पंकजा मुंडे यांचा आज जालना दौरा

जालना । प्रतिनिधी

**राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे या जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौऱ्यातील कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.**

शनिवार, दि. १४ जुन, २०२५ रोजी दुपारी १२.४० वाजता महिको विश्रामगृह जालना येथे आगमन व राखीव. दुपारी १.१५ वाजता महिको विश्रामगृह येथून जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालयाकडे प्रयाण. दुपारी १.३० वाजता जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालयात आगमन व नवीन वाहनांचा लोकार्पण सोहळ्यास उपस्थिती. दुपारी १.४५ वाजता जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालयातून शासकीय वाहनाने जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रयाण, दुपारी २ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे आगमन व जालना जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीस उपस्थिती. दुपारी ४.३० वाजता जालना येथून शासकीय वाहनाने अमरावतीकडे प्रयाण करतील.

पान १ वरून...

### शेतकऱ्यांना योग्यवेळी कर्जमाफी

आता १५० दिवसांचा कार्यक्रम देण्यात आला आहे. बैठकीत खरीप हंगामाच्या अनुषंगाने बी-बियाणे, खतांची उपलब्धता, पीककर्ज वाटपाचा आढावा घेतल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले. बी-बियाणे पुरेशा प्रमाणात आहे. डीएपीची कमतरता आहे. त्याबाबत कॅबिनेटमध्ये गेल्यावेळी निर्णय झालेला असून काय करता येईल, याबाबत कृषी खात्याच्या अधिकाऱ्यांना निर्देश दिलेले आहेत. बी-बियाणे, खताची कुणी लिंकिंग करीत असेल तर संबंधितांनी जिल्हाधिकाऱ्यांना माहिती द्यावी. त्यांच्याविरुद्ध कडक कायदेशीर कारवाई केली जाईल, असेही ते म्हणाले. दुग्ध विकासाबाबत केंद्र राज्याच्या चांगल्या योजना आहेत. शेतकऱ्यांनी त्याचा लाभ घेऊन पूरक व्यवसायातून उत्पन्न वाढीसाठी पुढाकार घ्यायला हवा, असेही त्यांनी सुचवले.

-----------

### शेतकरी कर्जमाफीच्या

शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळावी यासह विविध मागण्यांसाठी बच्चू कडू यांनी अमरावती येथे अन्नत्याग आंदोलन सुरु केले आहे. त्यांच्या आंदोलनाचा शुक्रवारी सहावा दिवस असून त्यांची प्रकृती खालावली आहे. यावेळी डॉक्टरांनी त्यांना उपचार घेण्याची विनंती केली मात्र बच्चू कडू यांनी कुठलीही सलाईन लावून घेणार नाही अशी भूमिका त्यांनी घेतली आहे. त्यामुळे फडणवीस सरकारचे टेन्शन वाढले आहे. तसेच बच्चू कडू यांच्या आंदोलनाला राज्यातील शेतकऱ्यांसह नेत्यांचाही पाठींबा मिळत आहे. शिवाय महसुल मंत्री चंद्रशेखर बावन्नकुळे यांनी आंदोलनस्थळी जावून बच्चू कडू यांची भेट घेऊन चर्चा केली आहे. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुध्दा फोनवर संपर्क केला आहे. यावेळी दोघांमध्ये बराच वेळ संवादही झाला. मुख्यमंत्री शेतकरी कर्जमाफीसंदर्भात सकारात्मक असल्याचे बच्चू कडू यांनी सांगितले आहे. सध्या आम्ही उपोषण मागे घेणार नाही. उद्या आम्ही यावर चर्चा करु असे बच्चू कडू म्हणाले. पण चंद्रशेखर बावनकुळे साहेबांनी शेतकरी कर्जमाफी करु हे सांगितल्याचे बच्चू कडू म्हणाले. कर्जमाफी संदर्भात दोन दिवसात कमिटी स्थापन करुन निर्णय घेतला जाईल अशी चर्चा मुख्यमंत्र्यांसोबत झाल्याची माहिती बच्चू कडू यांनी दिली आहे. समितीचा अहवाल आल्यावर शेतकरी कर्जमाफीसंदर्भात निर्णय घेतला जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितल्याचे बावन्नकुळे यांनी माहिती दिली आहे.

-----------

### इम्तियाज जलील

पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या विरोधातील पुरावे घेऊन माजी खासदार इम्तियाज जलील यांनी गुरुवारी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांची भेट घेतली. या भेटीला दानवेंनी सकारात्मक प्रतिसादही दिला. माजी खा. इम्तियाज जलील यांनी अंबादास दानवे यांना राज्याचे मुख्यमंत्री आणि राज्यपाल यांना निवेदन देण्यासाठी वेळ घ्यावा, अशी मागणी देखील केली. जलील यांच्या विनंतीनंतर दानवे यांनी पावसाळी अधिवेशनात प्रश्न उपस्थित करण्याचे आश्वासनही दिले. पालकमंत्री शिरसाट यांच्या विरोधातील व्हिट्स हॉटेल, एमआयडीसीमधील जागा, मागासवर्गीय शेतक-यांकडून केलेला व्यवहार, मुंबई व छत्रपती संभाजीनगरातील घर आदींसंबंधी कागदपत्रे इम्तियाज यांनी दानवेंच्या स्वाधीन केली.

-----------

### दुर्घटनाग्रस्त विमानाचा

सुरक्षा दल आणि अग्निशमन विभागासारख्या आपत्कालीन सेवा तेथे पोहोचतात. विमान अपघातानंतर, त्या अपघाताशी संबंधित माहिती मिळविण्यासाठी ब्लॅक बॉक्स ही एक अतिशय महत्त्वाची वस्तू ठरते. अपघात कितीही मोठा असला तरी, ब्लॅक बॉक्सला काहीही होत नाही, कारण तो टायटॅनियमपासून बनलेला असतो आणि अपघातादरम्यानही तो सुरक्षित राहतो. ब्लॅक बॉक्स सुरक्षित ठेवण्यासाठी तो एका मजबूत बॉक्समध्ये ठेवला जातो. ब्लॅक बॉक्स उड्डाणादरम्यान विमानाच्या हालचाली रेकॉर्ड करतो. ही एक डिजिटल डायरी आहे, जी विमानात बसवली जाते आणि त्यात बरीच माहिती साठवली जाते आणि जर अपघातानंतर ब्लॅक बॉक्स सापडला तर, त्यातून अपघाताची संपूर्ण माहिती मिळू शकते. दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अहमदाबाद येथे जाऊन जखमींची भेट घेतली असून घटनास्थळाची सुध्दा पाहणी केली आहे.

----------

### इस्त्रायलकडून इराणच्या

हुसेन सलामी यांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. मध्य पूर्वेतील देशाच्या लष्करासाठी सर्वात मोठा धक्का असल्याचे सांगण्यात येत आहे. मध्य पूर्वेतील तणाव वाढत असताना, इस्रायली सैन्याच्या म्हणण्यानुसार, इराणने काही तासांतच इस्रायलवर १०० हून अधिक ड्रोन डागून प्रत्युत्तर दिले. १९८० च्या इराण-इराक युद्धानंतर इराणमधील अनेक ठिकाणी, त्याच्या मुख्य अणुसंवर्धन सुविधा आणि क्षेपणास्त्र प्रतिष्ठानांसह, हा देशावरील सर्वात मोठा हल्ला असल्याचे दिसून आले. इराणच्या सरकारी टेलिव्हिजनने दिलेल्या वृत्तानुसार, इराणच्या निमलष्करी रिव्होल्युशनरी गार्ड्सचे प्रमुख जनरल हुसेन सलामी यांचा मृत्यू झाल्याची पुष्टी झाली आहे आणि उच्च लष्करी अधिकारी आणि शास्त्रज्ञ देखील मारले गेले आहेत असे मानले जात आहे. या आक्रमक कारवाईला ''ऑपरेशन रायझिंग लायन'' असे संबोधत इस्रायली पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी देशाच्या इतिहासातील एक निर्णायक क्षण म्हणून वर्णन केले आहे आणि म्हटले आहे की इस्रायली सैन्याने इराणच्या अणुसंवर्धन कार्यक्रमाच्या मुख्य गाभ्यावर हल्ला केला आहे. इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांनी इशारा दिला आहे की, इस्रायलला कठोर शिक्षा केली जाईल, कारण इराणच्या वेगाने प्रगती करणाऱ्या अणुकार्यक्रमावरून, विशेषतः डोनाल्ड ट्रम्प प्रशासनासोबत, तणाव वाढत असताना हे हल्ले झाले आहेत. दरम्यान, डोनाल्ड ट्रम्प प्रशासन इस्रायली हल्ल्यांपासून स्वतःला दूर ठेवण्याचा प्रयत्न करत आहे. इस्त्रायलने शुक्रवारी इराणच्या अणुकार्यक्रमावर हल्ला करून आणि अनेक लष्करी कमांडरांना ठार मारल्यानंतर इस्रायलला कठोर शिक्षा मिळेल असे इराणचे खोमेनी म्हणाले.

------------

### नवीन प्रभाग रचना रद्द

सरकारच्या १० जून २०२५ रोजी जाहीर केलेल्या नवीन प्रभाग रचना आदेशाला आव्हान दिले आहे. ८ जुलै २०२२ रोजी स्थगित केलेला निवडणूक कार्यक्रम जसेच्या तसा सुरू ठेवण्यात यावा, केवळ मतदार यादी नूतनीकरण आणि ओबीसी आरक्षण या बाबी समाविष्ट कराव्यात अशी विनंती सदर याचिकेत करण्यात आली आहे. या १४ मे २०२५ रोजी राज्य निवडणूक आयोगाने शासनाच्या नगरविकास विभागास पत्र दिले. त्यात राज्यातील प्रलंबित नगरपरिषद, जिल्हा परिषद नगरपंचायत आणि महानगरपालिकामध्ये नव्याने प्रभाग रचना करण्याविषयी निर्देश दिले होते. यामध्ये या पुर्वीच निवडणूक जाहीर झालेल्या ९२ नगरपरिषद आणि ४ नगर पंचायतीचा समावेश होता. राज्य सरकारने १० जुन २०२५ रोजी राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी नव्याने प्रभाग रचना करण्यासह अन्य बाबी जाहीर केल्या होत्या. त्याला अफसर शेख यांनी आक्षेप घेतला. ४ मे २०२२ रोजी सर्वोच्च न्यायालयाने प्रभाग रचनेसंदर्भात दिलेल्या आदेशानुसार राज्य शासनाचे ११ मार्च २०२२ रोजीचे नवीन प्रभाग रचना करण्याचे आदेश हे लागू होत नाहीत. तर ०६ मे २०२५ रोजीच्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशात ही नवीन प्रभाग रचना करण्याचे आदेश नाहीत असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशांनुसार नवीन प्रभाग रचनेचे आदेश रद्दबातल ठरतात. एकदा निवडणूक जाहीर झाल्यानंतर त्यामध्ये कोणतेही बदल वैध नाहीत असे याचिकाकर्त्याच्यावतीने सुनावणीवेळी म्हणणे मांडण्यात आले. एकदा निवडणूक जाहीर झाल्यानंतर राज्य निवडणूक आयोग व राज्य शासनाने नंतर घेतलेले विविध निर्णय व अधिसूचना प्रभावी होत नाहीत, असे न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. सुनावणीअंती खंडपीठाने राज्य निवडणूक आयोग आणि राज्य सरकारला नोटीस बजावली. याचिकाकर्ते अफसर शेख यांची बाजू ॲड. मुकुल कुलकर्णी आणि ॲड. मोबीन शेख यांनी मांडली.

------------

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शनिवार दि. १४ जून २०२५




## पाटोदा येथे भारतीय स्टेट बँकेच्या शाखेच्या भुमिपूजन सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन

पाटोदा । प्रतिनिधी

भारतीय स्टेट बँक, शाखा पाटोदा (छत्रपती शिवाजी महाराज चौक) येथील बँकेच्या इमारतीचे भुमिपूजन समारंभ रविवार, दि. १५ जून २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता आयोजित करण्यात आला आहे.हा सोहळा उत्साहात वातावरणात पार पडणार आहे.या कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार सुरेश (आण्णा) धस यांच्या शुभहस्ते होणार असून, ह.भ.प. प्रकाश महाराज बोधले, अध्यक्ष अखिल भारतीय वारकरी संप्रदाय, यांचे शुभाशीर्वाद लाभणार आहेत.या समारंभास प्रमुख अतिथी म्हणून खालील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे चंद्रशेखर रच्चा (... मॅनेजर, संभाजीनगर),अमित धुळे (... मॅनेजर, बीड), प्रफुल्ल खडले ( इंजिनिअर, संभाजीनगर),सतारी लिंगायत ( मॅनेजर, पाटोदा) तसेच पाटोदा नगरपंचायतचे नगराध्यक्ष,सभापती सर्व नगरसे


# अर्थमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा करून विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांचा प्रश्न मार्गी लावणार -धनंजय मुंडे

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीची रास्त मागणी सभागृहात मांडून येत्या पावसाळी अधिवेशनात टप्पा वाढीसाठी आवश्यक निधीची तरतूद करण्यासाठी उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित दादा पवार यांच्याशी चर्चा करून निधीची तरतूद होई पर्यंत पाठपुरावा करून आपला प्रश्न मार्गी लावतो असे आश्वासन माजी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी विना अनुदानित शाळा कृती समितीचे जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ आणि जेष्ठ समाजसेवक डॉ. संजय तांदळे यांना दिले.

माजीमंत्री धनंजय मुंडे हे काल दि. १३ जून रोजी बीड शहरात आले असता बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ आणि सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे यांनी त्यांची भेट घेऊन विना अनुदानित शाळेतील शिक्षकांच्या विविध मागण्यांचे निवेदन दिले. या मध्ये प्रामुख्याने राज्यातील अंशतः अनुदानित शाळांना १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन आदेध्याशानुसार वाढीव टप्प्यासाठी लागणाऱ्या आवश्यक निधीची तरतूद करावी अशी मागणी करण्यात आली.

यावेळी विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांशी



माजी मंत्री धनंजय मुंडे यांचे बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीला आश्वासन!

बोलताना धनंजय मुंडे म्हणाले की, महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळेत काम करणाऱ्या शिक्षकांच्या व्यथा वेदना याची मला जाणीव आहे. कित्येक दिवसापासून नव्हे तर वर्षापासून बिना पगारी काम करताना काय वेदना असतात. त्यांच्या घरची परिस्थिती कशी असते, याची मला चांगली जाणीव आहे त्यामुळे आपल्या सर्व मागण्या रास्त असून या रास्त मागण्या विधिमंडळात मांडून येत्या पावसाळी अधिवेशनात टप्पा वाढीसाठी आवश्यक निधीची तरतूद करण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित दादा पवार यांच्याशी चर्चा करून निधीची तरतूद व्हावी यासाठी प्रयत्न करणार आहे. जोपर्यंत टप्पा वाढीसाठी आवश्यक निधीची तरतूद होत नाही. तोपर्यंत पाठपुरावा सुरू ठेऊन तुमचा प्रश्न मार्गी लावतो असे आश्वासन माजी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी विना अनुदानित शाळा कृती समितीचे जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ आणि जेष्ठ समाजसेवक डॉ. संजय तांदळे यांना दिले. त्यामुळे येत्या पावसाळी अधिवेशनात वाढीव टप्प्याच्या निधीची तरतूद होऊन खूप दिवसांपासून टप्पा वाढीचा असलेला हा प्रलंबित प्रश्न मार्गी लागण्याचे संकेत उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांच्या पाठोपाठ माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी दिल्याने विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यात चैतन्याचे वातावरण तयार झाले आहे.



## ज्ञानेश्वर माऊली चाकरवाडी यांच्या पुण्यस्मरण दिन दक्षिणमुखी हनुमान भजनी मंडळाच्या वतीने साजरा

**कळंब । प्रतिनिधी**

श्री क्षेत्र चाकरवाडी येथील संत शिरोमणी ज्ञानेश्वर माऊली चाकरवाडी यांच्या २५ व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त दिनांक १० जून रोजी संत शिरोमणी ज्ञानेश्वर माऊली महाराज मंदिर कसबा पेठ कळंब येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले,, यानिमित्त माऊली मंदिर फुलांनी सजवले होते तसेच पूजा, आरती व भजन गायन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले ,याप्रसंगी दक्षिण मुखी हनुमान भजनी मंडळाचे चत्रभुज आप्पा चोंदे, नागनाथ शेंडगे, प्रा. जगताप, शिवदास पिंगळे, बबनराव वाघमारे, रामदास जाधव, विठ्ठल टोणगे,बब्रुवान कोळपे, आप्पा हजगुडे, बंडू मुंडे, परिमाळा घुले, मैनाबाई माळी, नंदाबाई पांचाळ, शेंडगे ताई,धोंडूबाई पांचाळ, यांनी भजन गायन कार्यक्रमात सहभाग घेतला.

## ‘संकल्प ते सिद्धी’ अंतर्गत धाराशिव भाजपचा जनता दरबार

धाराशिव । प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या ११ वर्षांच्या यशस्वी कारकिर्दीच्या निमित्ताने भारतीय जनता पक्षातर्फे ‘संकल्प ते सिद्धी’ अभियानांतर्गत रविवारी, १५ जून रोजी धाराशिव जिल्ह्यात विविध ठिकाणी ‘जनता दरबार’चे आयोजन करण्यात येत आहे. माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांच्या मार्गदर्शनाने आणि आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या नेतृत्त्वात साकार होणाऱ्या या उपक्रमातून नागरिकांच्या अडचणी आणि तक्रारी थेट ऐकून शासकीय यंत्रणा आणि पक्ष पातळीवर त्यांचे निराकरण करण्याचा भाजपचा मानस आहे. जिल्ह्यातील तुळजापूर, धाराशिव आणि कळंब तालुक्यांमध्ये सहा गटांमध्ये हे जनता दरबार आयोजित केले जाणार असून, गावागावातील नागरिकांना आपल्या समस्या मांडण्याची संधी मिळणार



**जनसंपर्काला बळकटी, गावागावात थेट संवाद**

आहे. भाजप जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी नागरिकांना या दरबारात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. रविवारी सकाळी १० वाजता जनता दरबाराला सुरुवात होणार आहे. कळंब तालुक्यातील ईटकुर येथे भाजप नेते नेताजी पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि अरुण चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली दरबार होईल. शिराढोण येथे जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा अस्मिता कांबळे यांच्या उपस्थितीत आणि दत्ता साळुंखे यांच्या संयोजनाखाली कार्यक्रम पार पडेल. धाराशिव तालुक्यातील ढोकी येथे माजी जि.प. सभापती ॲड. दत्तात्रय देऊळकर यांच्या उपस्थितीत आणि अनिल भुतेकर यांच्या अध्यक्षतेखाली दरबार आयोजित होईल. कोंड येथे ॲड. नितीन काळे यांच्या उपस्थितीत आणि नीलकंठ पाटील यांच्या संयोजनाखाली जनता दरबार होणार आहे. तुळजापूर तालुक्यातील काटगाव येथे ॲड. खंडेराव चौरे यांच्या उपस्थितीत आणि महादेव जाधव यांच्या संयोजनाखाली कार्यक्रम होईल, तर नांदगाव येथे दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या उपस्थितीत आणि रंजना राठोड यांच्या अध्यक्षतेखाली दरबार पार पडेल.‘संकल्प ते सिद्धी’ अभियानातून शासन आणि जनता यांच्यात थेट संवाद साधण्यासाठी भाजपचे नेते आणि कार्यकर्ते गावागावात पोहोचत आहेत.

## वादळामुळे शेतकरी राऊत यांचा लाखो रुपयांचा संत्रा बाग झाला जमीनदोस्त



**आ.सुरेश धस आण्णा यांच्या नेतृत्वखाली दखल घेतल्यामुळे नुकसान ग्रस्त शेतकरी यांच्या पंचनामा करण्यासाठी वेग**

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील धामणगाव मध्ये रात्री झालेले वादळी वाऱ्यासह संत्री बाग जमीन उध्वस्त झाले आहे.

येथील सलुन धारक शेतकरी कल्याण विठ्ठल राऊत धामणगाव मध्ये चक्रीवादळ झाल्यामुळे बरेचशे शेतकऱ्यांच्या संत्री बागा जमीन उध्वस्त झाल्या आहेत...या वादळामुळे कल्याण विठ्ठल राऊत यांचे तब्बल लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचे कल्याण राऊत यांनी सांगितले या नुकसानीचा पंचनामा आज सकाळी तलाठी गवळी साहेब

कुषी साह्यक ऊषा हुमी मॅडम भाऊसाहेब लोखंडे पंचनामा करून घेतला व आम्ही नक्की या नुसकानीची मदत सरकार कडून देण्याचा प्रयत्न करु असे त्यांनी सांगितले या नुकसानीने पंचक्रोशीतुन हाळ हाळ व्यक्त होत आहे अन्? तळतळीने शेतकरी हतबल होऊन सरकार कडे मदतीचा हात मागत आहे.



बीड : माजी मंत्री धनंजय मुंडे बीड शहरात आले असता त्यांचे स्वागत करताना राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष श्री राजेश्वर चव्हाण जिल्हा सरचिटणीस श्री बाप्पा साहेब घुगे यांच्यासोबत ज्येष्ठ समाजसेवक डॉ श्री संजय तांदळे दिसत आहेत.

पान ६ वरून...

### धनंजय मुंडे यांनी

काम यांसह जिल्हा स्तरावर प्रलंबित असणारे किंवा जिल्हा स्तरावरून प्रस्तावित करावयाच्या विविध विकासकामांच्या अनुषंगाने धनंजय मुंडे यांनी सूचना केल्या.

यावेळी माजी आ. संजय भाऊ दौंड, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड. राजेश्वर आबा चव्हाण, अविनाश नाईकवाडे, जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा क्रीडा अधिकारी, पुरातत्व विभागाचे अधिकारी, यांसह आदी उपस्थित होते.

### राष्ट्रीय किसान मोर्चाने दिले

यावरही सरकारने किंवा आमच्या लोकप्रतिनिधींनी शेतकऱ्यांच्या समस्यांचा विचार करून सोडविण्याचा प्रयत्न केला नाही. तर येत्या १ जुलै २०२५ रोजी भारत बंद घोषित केला आहे. असे यावेळी आंदोलकांकडून सांगण्यात आले. यावेळी बळीराम सरवदे, संभाजी ब्रिगेडचे संभाजी घोरपडे, महादेव सरवदे, गोविंद कदम, संभाजी ब्रिगेडचे नारायणराव मुळे, संभाजी ब्रिगेड महिला आघाडीच्या सुनंदाताई लोखंडे, अण्णासाहेब देशमुख, चंद्रकांत सरवदे, गोविंद जामदार यांच्यासह राष्ट्रीय किसान मोर्चा, भारत मुक्ती मोर्चा, राष्ट्रीय पिछडा वर्ग मोर्चा, संभाजी ब्रिगेडचे कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

### दिंद्रुड येथे माजी आ. बच्चू

दिंद्रुड व परिसरातील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विविध मागण्यांचे निवेदन दिंद्रुड पोलीस ठाण्याचे सपोनि महादेव ढाकणे यांना देण्यात आले. महामार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यासाठी व आंदोलन स्थळी पोलिसांनी चोख नियोजन केले होते.

# प्रा.डॉ.दिलीप मस्के यांना बेस्ट अकॅडमिशन अवार्ड

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**अबुधाबी विद्यापीठ दुबई (कॅम्पस) येथे २३ मे २०२५रोजी पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत वेणूताई चव्हाण प्रतिष्ठान संचलित, कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, आंबेजोगाई येथील डॉ. दिलीप सिताराम मस्के यांना त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याबद्दल बेस्ट अकॅडमिशन अवार्ड ने सन्मानित करण्यात आले.**

ही आंतरराष्ट्रीय परिषद अबुधाबी युनिव्हर्सिटी दुबई युएई, निजवा विद्यापीठ ओमन आणि दिगंबरराव बिंदू महाविद्यालय भोकर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. सदर पुरस्कार अबुधाबी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. हमद ओधाबी यांच्या हस्ते सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. याप्रसंगी प्रो. मोन्टासिर क्यूशामेह (अबुधाबी) प्रो रियाज अहमद (ओमेन) डॉ. अरविंद चव्हाण महाराष्ट्र उपस्थित होते. डॉ. दिलीप मस्के यांची महाविद्यालयात २८ वर्ष सेवा झाली



असून त्यांनी आतापर्यंत प्राध्यापक, संशोधक, केंद्रप्रमुख, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी, म्हणून कार्य केले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर समाजशास्त्र अभ्यास मंडळ सदस्य म्हणून कार्य केले आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागात विविध उपक्रम राबवून जनजागृतीचे कार्य केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठानचे अध्यक्ष म्हणून गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक धार्मिक कार्य करीत आहेत. या कार्यव्यतिरिक्त त्यांनी अनेक पीएच.डी.च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांच्याकडे आजही महाराष्ट्र शासनाची बार्टी व सारथी ची फेलोशिप मिळालेले पीएच.डी.चे विद्यार्थी काम करत आहेत. या कार्याबद्दल छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) पुणे. व्यवस्थापकीय संचालक यांनी विशेष पत्र पाठवून पीएच.डी मार्गदर्शनाबाबत अभिनंदन केले आहे. त्यांचे अनेक विद्यार्थी पदवी ,पदव्युत्तर विद्यावाचस्पती होऊन विविध ठिकाणी शासकीय निमशासकीय पदावर कार्यरत आहेत. नेपाळ, थायलंड, दुबई येथे जाऊन कॉन्फरन्स मध्ये त्यांनी संशोधन लेख सादर केले आहेत. त्यांनी आतापर्यंत जवळपास ८५ संशोधन पेपर राज्य ,राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रकाशित केले आहेत. त्यांच्या या कार्याचा गौरव म्हणून अबुधाबी विद्यापीठ, दुबई येथे त्यांचा गौरव करण्यात आला. त्याबद्दल वेनूताई चव्हाण प्रतिष्ठानचे सचिव राजेंद्रजि लोमटे, उपाध्यक्ष सतीश नाना लोमटे, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, मित्र, पत्रकार आदिने अभिनंदन केली आहे.

## घरकुल धारकांनी कुणालाही रूपया देऊ नये - गटविकास अधिकारी बागलाने



आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यात जवळपास नवीन घरांसाठी वीस हजार पेक्षा अधिक मागणी अर्ज बेघर धारकांनी केले आहेत.आता नविन मंजूर झालेल्या घरकुल धारकांनी कुणालाही एक रूपाया देऊ नये,जर कुणी मागणी केली तर त्याची तक्रार आमच्याकडे रितसर करावी आणि यंदाची दिवाळी नव्या घरात साजरी करावी असे आवाहन आष्टी पंचायत समिती चे गटविकास अधिकारी जी.व्ही.बागलाने यांनी केले आहे.

आष्टी पंचायत समिती कार्यालयातील गटविकास अधिकारी यांच्या कक्षेत शुक्रवार (दि.१३)रोजी दुपारी ४.३० वा.पत्रकारांशी संवाद साधताना ते बोलत होते.पुढे बोलतांना ते म्हणाले,पक्के आणि प्रशस्त घर असावे हे प्रत्येकाचं स्वप्न असत.केंद्र व राज्य सरकारच्या संकल्पनेतून व आमदार सुरेश धस यांच्या प्रयत्नाने आष्टी तालुक्यात जवळपास २० हजारांपेक्षा जास्त गरजूंनी अर्ज दाखल केले आहेत.आता ह्या घरांची स्वप्न येत्या दिवाळीत पुर्ण होऊन यंदाची दिवाळीच नव्या घरात घरकुल धारकांनी साजरी करावी.परंतु ही नव्या घरात दिवाळी साजरी करण्यासाठी कुणाला रूपाया देण्याची गरज नाही असे आवाहन गटविकास अधिकारी बागलाने यांनी सांगितले.

## विकसित कृषी संकल्प अभियानाची यशस्वी सांगता जिल्ह्यातील ९० पेक्षा अधिक गावांत कृषी विज्ञान केंद्राचा संपर्क

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय भारत सरकार यांच्या संकल्पनेतून व दीनदयाल शोध संस्थान कृषि विज्ञान केंद्र अंबाजोगाई, भारतीय कृषी अनुसंधान परिषद, राज्य कृषी विभाग व आत्मा यांच्या संयुक्त विद्यमाने २९ मे ते १२ जून २०२५ दरम्यान ‘विकसित कृषी संकल्प अभियान’ मोठ्या उत्साहात राबविण्यात आले. बीड जिल्ह्याच्या अंबाजोगाई, केज, परळी, धारूर, वडवणी व माजलगाव या सहा तालुक्यांतील ९० हून अधिक गावांमध्ये कृषी विज्ञान केंद्राच्या शास्त्रज्ञांच्या टीमने भेटी देऊन शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला.



या अभियानादरम्यान शेतकऱ्यांना खरीप हंगाम नियोजन, पीक निवड, सुधारित वाणांची माहिती, बीज प्रक्रिया, जैविक खते व जैविक कीड नियंत्रण, मान्सून हवामानाचे अंदाज, नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन (विशेषतः वीज पडणे व त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय), कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित तंत्रज्ञानाचे महत्त्व, रुंद वरंबा-सरी तंत्रज्ञानाचा वापर, आणि कृषी ड्रोन वापर आदी विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. प्रत्येक गावात ‘कृषिरथ’ च्या माध्यमातून विविध कृषी तंत्रज्ञान व शासनाच्या योजनांचा प्रसार करण्यात आला. कृषीविषयक योजनांची माहिती देत शेतकऱ्यांना लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले. या अभियानात केंद्र व राज्य शासनातील अधिकारी, राष्ट्रीय संशोधन संस्थांचे शास्त्रज्ञ, आत्मा कर्मचारी व कृषी सहाय्यक यांनीही सक्रिय सहभाग नोंदवला. अभियानाच्या माध्यमातून हजारो शेतकऱ्यांपर्यंत थेट पोहोचून त्यांना तांत्रिक सल्ला, कृषी नियोजनाची दिशा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचे महत्त्व पटवून देण्यात यश आले. कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. वसंत देशमुख यांनी सांगितले की, “हे अभियान म्हणजे केवळ माहिती प्रसार नव्हे तर शाश्वत व आत्मनिर्भर शेतीकडे वाटचाल करणारा महत्त्वाचा टप्पा आहे.“ या अभियानामुळे शेतकऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला असून, आगामी खरीप हंगामात त्याचा सकारात्मक परिणाम दिसून येईल, असा विश्वास कृषी विज्ञान केंद्राने व्यक्त केला आहे.

### जाहीर प्रगटन ॲड. वाय.एन मुंढे

**मा. श्री. अ.सं. जगताप, दिवाणी न्यायाधीश क. स्तर शिरूर कासार यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नं. १५९/२०२५**

**दौलतबी वि. निल**

अर्जदार : १. दौलताबी शम्शुदिन शेख वय-८६, धंदा घरकाम, रा. तागडगांव ता. शिरूर का. जि. बीड ह.मु. विठ्ठल मंदिराजवळ, विठ्ठल नगर, पिंपरी, पुणे. २. खालीकनुर शम्शुदिन शेख वय-५१. धंदा मजुरी, रा. वरील प्रमाणे ३. रहिमान शम्शुदिन शेख वय ४७, धंदा मजुरी, रा. वरीलप्रमाणे ४. शेख कलीमा भ्र. कडु वय ६०, धंदा-घरकाम रा. टेल्को रोड जवळ, अशा टेलर बाली नगर, पावर हाउस भोसरी, पुणे ५. जयबुनीशा बशिर शेख वय ५५, धंदा-घरकाम रा. जवळा, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर ६. मुन्नाबी रशीद शेख वय-४९, धंदा घरकाम रा. शेख चाळ, स.नं १२४/४ मंगलमुर्ती सोसा. सद्गुरू नगर भोसरी, पुणे

**अर्ज: बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाण मिळणे बाबत**

ज्यापेक्षा मयत शमशुदिन पि. बाशाभाई शेख यांचा मृत्यू दि. ०५.०४.२०२४ रोजी मौजे विठ्ठल मंदिर, नेहरु नगर, पिंपरी चिंचवड, हवेली, पुणे येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हे

मयताचे एकमेव कायदेशीर वारस आहेत असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे उपरोक्त मयत यांचे वारस नव्हेत असे कोणास समजविष्याये असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरह मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु उपरोक्त मयत यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल

आज दिनांक २६.०५.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख ३०.०६.२०२५ ही आहे.

**स्वाक्षरित/-**
**क. लिपीक**

**स्वाक्षरित/-**
**आदेशावरुन,**
**सहा. अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर. शिरूर का.**

# महाराष्ट्रात पुढील ५ दिवस धोधो पाऊस !

## पहिल्या टप्प्यात ५ कोटी १ लाख ९७ हजार रुपयांचे होणार वितरण

पुणे : महाराष्ट्रात पुढील काही दिवसांत हवामानात मोठा बदल होणार असून, राज्यभरात मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. विशेषतः कोकण, घाटमाथा आणि मध्य महाराष्ट्रात पावसाचा जोर अधिक राहण्याची शक्यता आहे. या काळात मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, कोल्हापूर आणि सातारा या जिल्ह्यांमध्ये पावसाचा प्रभाव जास्त जाणवणार आहे. या भागांसाठी भारतीय हवामान खात्याने विशेष इशारे (ऑरेंज आणि यलो अलर्ट) जारी केले आहेत. मुंबईतही आज मुसळधार पावसाची शक्यता असून, ढगाळ वातावरण आणि मध्यम ते जोरदार सरी पडण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.



सध्या मान्सूनने महाराष्ट्रात सुरुवात केली असली तरी सुरुवातीला त्याचा वेग मंदावला होता. मागील पंधरा दिवसांपासून अनेक भागांमध्ये मान्सूनच्या सरी कमी पडल्या होत्या, त्यामुळे तापमानात वाढ झाली होती आणि नागरिक उकाड्याने त्रस्त होते. मात्र आता हवामान विभागाच्या अंदाजानुसार, नैऋत्य मोसमी वारे पुन्हा सक्रीय होऊ लागले आहेत आणि राज्यात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकरी, नागरिक आणि प्रशासन या सगळ्यांनाच यापुढील काळात विशेष खबरदारी घ्यावी लागणार आहे. हवामान खात्याच्या माहितीनुसार, सध्या महाराष्ट्रात दोन महत्त्वाच्या हवामान प्रणाली सक्रीय आहेत. एक ट्रफ लाईन (दाब कमी होण्याची रेषा) तामिळनाडूपासून दक्षिण महाराष्ट्रापर्यंत सक्रिय आहे. दुसरीकडे, उत्तर ओडिशा आणि आसपासच्या भागांमध्ये चक्राकार वारे सक्रिय झाले असून, ते हळूहळू दक्षिण महाराष्ट्राकडे सरकत आहेत. या दोन्ही प्रणालींच्या परिणामस्वरूप कोकण, घाटमाथा आणि मध्य महाराष्ट्रात जोरदार पावसाचा कालावधी सुरु होण्याची शक्यता आहे. कोकणात विशेषतः १३ आणि १४ जून रोजी २४ तासांत २०४.५ मिमी पेक्षा अधिक पाऊस पडू शकतो, जो मुसळधार पावसाच्या श्रेणीत मोडतो. मध्य महाराष्ट्रातही पावसाची पातळी

### शेतकऱ्यांना पोषक वातावरण

या पावसामुळे शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी पोषक वातावरण मिळणार आहे. पेरणीसाठी आवश्यक अशी मातीतील ओलावाही यामुळे वाढेल. मात्र, सतत व अतिवृष्टीमुळे काही ठिकाणी बियाणे कुजण्याची किंवा पेरणीस अडथळा येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे कृषी विभागाने शेतकऱ्यांना हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन नियोजन करण्याचे आवाहन केले आहे. प्रशासनाला पूरस्थिती, पाणी साचणे, विजा कोसळणे यांसारख्या संभाव्य आपत्कालीन परिस्थितींसाठी सज्ज राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. नागरिकांनी शक्यतो अनावश्यक प्रवास टाळावा, हवामान विभागाच्या सूचना ऐकाव्यात आणि सुरक्षिततेसाठी खबरदारी घ्यावी.

६४.५ मिमी ते २०४.४ मिमी दरम्यान राहू शकते. घाटमाथ्याच्या भागात जसे की सह्याद्री पर्वत रांगा, तिथे भूस्खलन, दरड कोसळणे, रस्ते बंद होणे, नद्यांचे पाणी वाढणे अशा घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे मुंबई-पुणे महामार्ग, कोकण रेल्वे मार्ग तसेच इतर घाटमाथ्यांवरील प्रवास करताना खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# लेमन ग्रासची शेती करून मिळवा मोठा नफा



सध्याच्या काळात शेतकरी विविध प्रकारे नवनवीन तंत्रज्ञान आणि नवनवीन पिकांचे प्रयोग करताना दिसत आहेत. ज्यातून त्यांना चांगला नफाही मिळतो आहे. असेच एक पीक म्हणजे लेमन ग्रास होय. याचा वापर बहुतांशी कॉस्मेटिक, डिटर्जंट, आणि औषधांमध्ये केला जातो. कमी कालावधी मध्ये तयार होणाऱ्या या पिकाला सध्या चांगली मागणी आहे. औषधी वनस्पती असल्याने याचे बरेच उपयोग आहेत. योग्य तंत्राचा वापर करून या पिकाची लागवड केल्यास चांगला नफा मिळू शकतो. तसेच यासाठी लागणारी गुंतवणूकही कमी असते.याची लागवड केल्यानंतर चार महिन्यांमध्येच हे पीक तयार होते. औषधांसोबतच या पिकापासून बनवलेल्या तेलाला देखील बाजारात चांगली मागणी आहे आणि किमतही चांगली मिळते. या पिकाच्या शेतीचे वैशिष्ट्य म्हणजे या पिकासाठी कोणत्याही प्रकारच्या खताची आवश्यकता भासत नाही. आणि हे पीक एकदा पेरले की पाच ते सहा वर्षापर्यंत ते चालते. याची पेरणी फेब्रुवारी ते जुलै च्या दरम्यान करता येते. एकदा याची पेरणी केली की, पाच ते सहा वेळा याची कापणी करता येते. यापासून तयार केल्या जाणाऱ्या तेलाची किंमत हजार ते दीड हजार रु लिटर अशी असते. एका एकरातून साधारण ५ ते ६ लिटर तेल निघते. गणिती रुपात हिशोब करायचा झाल्यास याच्या लागवडीसाठी ३० ते ४० हजार रु. खर्च येतो आणि एका वर्षात ३ ते ४ वेळा याची कापणी करता येते. म्हणजे साधारण वर्षाकाठी १ ते दीड लाख रु. इतके उत्पादन या पिकातून मिळते. त्यामुळे जर कमी कालावधीत चांगला नफा मिळवायचा असेल तर लेमन ग्रास ची शेती करायला हरकत नाही.

## वीज पडो, सर्पदंश असो, किंवा इतर नैसर्गिक कारणाने

# शेतकऱ्याचा मृत्यू झाला तर मिळणार २ लाख अनुदान

पुणे : शेती हा व्यवसाय जितका महत्त्वाचा आणि उत्पादनक्षम आहे, तितकाच तो संकटांनी भरलेला आणि धोकादायकही असतो. अनेक वेळा शेतकरी आपल्या शेतीच्या कामात गर्क असताना अचानक अपघात होतो किंवा वीज पडणे, सर्पदंश, प्राण्यांचा हल्ला, खड्ड्यात पडणे, यंत्राचा अपघात किंवा अन्य कोणत्याही नैसर्गिक आपत्तीमुळे प्राण गमावतो. अशा दुर्दैवी घटनेत शेतकऱ्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळतो आणि आर्थिक संकटही ओढवते. अशा वेळी त्या कुटुंबाला थोडीफार आर्थिक मदत मिळावी या उद्देशाने शासनाने 'गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सानुग्रह अनुदान योजना' सुरू केली आहे.



ही योजना अपघातामुळे मृत्यू झाल्यास किंवा कायमस्वरूपी अपंगत्व आल्यास शेतकरी किंवा त्यांच्या कुटुंबाला २ लाख रुपये आर्थिक मदत देण्याची तरतूद करते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी काही अटी आणि आवश्यक प्रक्रिया आहे. योजनेअंतर्गत १० ते ७५ वयोगटातील शेतकरी पात्र आहेत. कोणताही अपघात घडल्यानंतर ३० दिवसांच्या आत संबंधित व्यक्तीने किंवा कुटुंबीयांनी तालुका कृषी अधिकारी किंवा जिल्हा कृषी अधीक्षक यांच्याकडे अर्ज सादर करावा लागतो. अर्ज सादर झाल्यानंतर तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेतली जाते. त्यात अर्जाची प्राथमिक छाननी होते आणि नंतर हा अर्ज जिल्हास्तरीय समितीकडे पडताळणीसाठी पाठवण्यात येतो. सर्व अधिकृत प्रक्रिया पूर्ण झाल्यावर पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट दोन लाख रुपयांची रक्कम जमा केली जाते. या योजनेसाठी अर्ज करताना काही आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणे बंधनकारक आहे. त्यामध्ये मृत्यू प्रमाणपत्र, अपघाताचा तपशील, पोलीस पंचनामा, रुग्णालयातील रिपोर्ट, ड्रायव्हिंग लायसन्स (जर अपघात वाहन संबंधित असेल तर), तसेच आधार कार्ड, पॅन कार्ड, बँक पासबुक, आणि फोटोसह अर्ज इत्यादींचा समावेश असतो. अपघात नैसर्गिक कारणामुळे, जसे की वीज पडणे किंवा सर्पदंश यामुळे घडल्यास, संबंधित शासकीय अधिकाऱ्यांकडून त्या घटनेची खात्री करून दिली जाते.

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सानुग्रह योजना ही केवळ आर्थिक मदतीची योजना नसून ती शेतकऱ्याच्या योगदानाची दखल घेणारी एक सामाजिक हमी आहे. शेती करताना शेतकऱ्याचे जीवावर बेतू शकते, हे शासन मान्य करत असून त्यांच्या पश्चात कुटुंबाचे आयुष्य सावरावे म्हणून ही मदत अत्यंत उपयुक्त ठरते. यामुळे शासनाचा उद्देश म्हणजे केवळ मदतपुरता मर्यादित न राहता, एक सकारात्मक सामाजिक सुरक्षा कवच तयार करणे आहे.

# मधमाश्यांच्या पोषणासाठी नवीन अन्न स्त्रोताची निर्मिती

निरोगी मधमाश्या परागीकरण कार्यक्षमता सुधारून पिकांचे उत्पादन वाढविण्यास मदत करू शकतात. मात्र गेल्या काही दशकांमध्ये मधमाश्यांच्या वसाहती सातत्याने घटत आहेत. त्यामुळे कृषी क्षेत्रातील उत्पादकता धोक्यात येत आहे. त्यामुळे मधमाश्यांच्या वसाहती नष्ट होण्यामागील कारणांचा एका बाजूला शोध घेतला जात आहे. तर दुसऱ्या बाजूला मधमाश्यांसाठी अन्नाची उपलब्धता कशा प्रकारे करता येईल, यावर संशोधन केले जात आहे. या प्रक्रियेमध्ये शास्त्रज्ञांनी एक नवीन अन्न स्रोत विकसित केला आहे. त्यामुळे नैसर्गिक परागकणांची उपलब्धता कमी असल्याच्या स्थितीतही मधमाश्यांच्या वसाहती टिकून राहण्यास मदत होणार आहे. हे संशोधन 'प्रोसिडिंग्स ऑफ दी रॉयल सोसायटी बी : बायोलॉजिकल सायन्सेस'मध्ये प्रकाशित करण्यात आले आहे.



अन्य पाळीव पशू, पक्ष्यांसाठी ज्या प्रमाणे सूत्रबद्ध आहाराची निर्मिती करण्यामध्ये शास्त्रज्ञांना यश आले आहे, त्या प्रमाणेच मधमाश्यांच्या वसाहतीच्या आरोग्यासाठी आवश्यक असलेले सर्व आवश्यक पोषक घटक नवीन आहारामध्ये आणण्याचा प्रयत्न केला आहे. हा आहार देणेही अत्यंत सोपे बनविण्यात आले आहे. कारण हे मानवी पॉवर बार सारखे दिसणारे खाद्य थेट पोळ्यांमध्ये ठेवले जाते. त्यावर तरुण मधमाश्या संपूर्ण वसाहतीत पोषक तत्त्वांवर प्रक्रिया करून अळ्या आणि प्रौढांपर्यंत वितरणाचे काम करतात.

अमेरिकेतील वॉशिंग्टन राज्य विद्यापीठ आणि बेल्जियममधील 'एपीआयएक्स बायोसायन्सेस एनव्ही' यांच्या जर्नलमध्ये प्रकाशित या अभ्यासात वॉशिंग्टन राज्यातील व्यावसायिक पीक परागीकरणात वापरल्या जाणाऱ्या पोषणाच्या ताणाखाली असलेल्या मधमाश्यांच्या वसाहती नवीन आहार दिल्यावर भरभराटीला आल्याचे दिसून आले. वातावरणात परागकणांची पुरेशी संख्या नसणे, हीच मधमाशी वसाहतीच्या तग न धरण्यामागील मुख्य समस्या आहे. त्याविषयी माहिती देताना वॉशिंग्टन राज्य विद्यापीठातील परागकण पर्यावरणशास्त्राचे पी.एफ. थर्बर एन्डोव्ड म्हणाले, की जमिनीच्या वापरातील बदल, शहरी विस्तार आणि तीव्र हवामान यामुळे मधमाश्या आणि इतर परागकणांच्या पोषणावर नकारात्मक परिणाम होतो.

संशोधनाचे सहलेखक ब्रँडन हॉपकिन्स म्हणाले, की मधमाश्यांना सर्व पोषण एकाच स्रोतातून मिळत नाही. जगण्यासाठी त्यांच्या आहारात विविधतेची आवश्यकता असते.

परंतु वसाहत टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या परागकणांचा शोध घेत राहणे व तो मिळवून तो वसाहतीला पुरवत राहणे, हे कठीण होत चालले आहे.

'एपिक्स बायोसायन्सेस यूएस'चे कार्यकारी अधिकारी डॉ. पॅट्रिक पिल्किंग्टन यांनी सांगितले, की मधमाशीपालन मोठ्या प्रमाणात केले जात असले तरी त्यासाठी मानवनिर्मित आहार आपण उपलब्ध करू शकलो नव्हतो. व्यावसायिक मधमाशीपालन करताना काही क्षेत्रामध्ये पौष्टिक घटकांची कमतरता भासल्याने वसाहतींवर मोठा ताण येतो. तो कमी करण्यासाठी परागकण बदलणाऱ्या खाद्याचा वापर करणे शक्य आहे. त्यामुळे वसाहतींचे आरोग्य सुधारते. या उत्पादनामध्ये मधमाश्यांच्या व्यवस्थापनाची पद्धत बदलण्याची क्षमता आहे.

जागतिक संशोधन शक्य :

जागतिक पातळीवर संशोधन सहकार्यातून हे संशोधन पूर्णत्वास गेल्याची माहिती बेल्जियम येथील एपिक्स बायोसायन्सेसचे अध्यक्ष थियरी बोगार्ट यांनी दिली. ते म्हणाले, की या संशोधनामध्ये एपिक्स बायोसायन्सेसचे शास्त्रज्ञ गेल्या दहा वर्षांपेक्षाही अधिक काळापासून विविध घटकांच्या आहारातील वापरासंदर्भात चाचण्या घेत आहे. दुसरा संशोधन संघ वॉशिंग्टन राज्य विद्यापीठातील मधमाशीविषयक तज्ज्ञांचा असून, कॅलिफोर्नियातील मधमाशी पालकांची संघटना यांनी प्रत्यक्ष प्रक्षेत्रावर वैज्ञानिक चाचण्या घेण्यामध्ये मोलाची भूमिका निभावली आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

११५८ : इसार नदीच्या काठावर म्यूनिच शहर स्थापन केले.
१७०४ : मुघलांच्या कैदेत असलेल्या संभाजीराजे यांच्या मुलाचे औरंगजेबाने लग्न लावून दिले.
१७७५ : अमेरिकन सैन्य दलाची स्थापना करण्यात आली.
१७७७ : अमेरिकेने 'स्टार्स अँड स्ट्राइप्स' या ध्वजाचा स्वीकार केला.
१७८९ : मक्यापासुन पहिल्यांदाच 'व्हिस्की' तयार करण्यात आली. तिला 'बोर्बोन' असे नाव देण्यात आले कारण तयार करणारा रेव्हरंड क्रेग हा केंटुकी प्रांतातील 'बोर्बोन' येथील रहिवासी होता.
१८९६ : महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी 'अनाथ बालिकाश्रम' ही संस्था स्थापन केली. यातुनच पुढे कर्वे स्त्री शिक्षण संस्था, एस. एन. डी. टी. विद्यापीठ असे मोठमोठे उपक्रम सुरू झाले.
१९०१ : पहिल्यांदा गोल्फ खेळाची प्रतियोगिता अमेरिकेत आयोजित करण्यात आली.
१९०७ : नॉर्वेत स्त्रियांना मतदानाचा अधिकार.
१९२६ : ब्राझील लीग ऑफ नेशन्समधून बाहेर.
१९३४ : ऑस्ट्रिया देशाची राजधानी वियना येथे जर्मन शासक हिटलर आणि मुसोलिनी यांची भेट झाली.
१९३८ : सुपरमॅनची चित्रपट कथा पहिल्यांदा प्रकाशित.
१९४० : जर्मनीने पॅरिस ताब्यात घेतल्यामुळे दोस्त राष्ट्रांनी तिथुन माघार घेतली.
१९४५ : भारताला स्वायत्तता देण्यासंबंधीची वेव्हेल योजना जाहीर
१९५२ : अमेरिकेने अणुशक्तीवर चालणारी पहिली पाणबुडी यू. एस. एस. नॉटिलस बांधण्यास सुरुवात केली.
१९६२ : पॅरिसमध्ये युरोपियन अंतराळ संशोधन संस्था स्थापन झाली नंतर युरोपियन स्पेस एजंसी बनली.
१९६७ : चीनने पहिल्या 'हायड्रोजन बॉम्ब' ची चाचणी केली.
१९६७ : मरिनर अंतराळ यान शुक्राकडे प्रक्षेपित.
१९७२ : डी. डी. टी. या कीटकनाशकाच्या वापरावर अमेरिकेत बंदी घालण्यात आली.
१९९९ : दक्षिण आफ्रिकेचे पहिले श्वेतवर्णीय राष्ट्राध्यक्ष नोबेल पारितोषिक विजेते नेल्सन मंडेला यांचा कार्यकाळ संपला.
२००१ : ए. सी. किंवा डी. सी. यापैकी कोणत्याही विद्युतप्रवाहावर चालणार्या उपनगरी गाडीचा शुभारंभ पश्चिम रेल्वेचे महाव्यवस्थापक वासुदेव गुप्ता यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१३९८ : संत कबीर.
१४४४ : भारतीय खगोलशास्त्रज्ञ आणि गणितज्ञ निळकंथा सोमायाजी यांचा जन्म.
१७३६ : चार्ल्स कुलोम फ्रेन्च भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: २३ ऑगस्ट १८०६)
१८६४ : अलॉइस अल्झायमर जर्मन मेंदुविकारतज्ञ (मृत्यू: १९ डिसेंबर १९१५)
१८६८ : कार्ल लॅन्ड्स्टायनर नोबेल पारितोषिक विजेते ऑस्ट्रियन जीवशास्त्रज्ञ (मृत्यू: २६ जून १९४३)
१८९९ : महावीर चक्र सन्मानित माजी भारतीय सैन्य अधिकारी ब्रिगेडियर राजिंदर सिंह यांचा जन्मदिन.
१९०० : भारतीय निबंध लेखक आणि मल्याळम साहित्यांचे साहित्यिक समीक्षक कारिककट्ट मराठू कुट्टिकृष्ण मरार यांचा जन्मदिन.
१९१६ : माजी भारतीय लष्कर प्रमुख अधिकारी दिवान प्रेम चंद यांचा जन्मदिन.
१९२० : प्रख्यात जैन धर्मीय स्वेतंबर तेरापंथ आदेशाचे दहावे प्रमुख, संत, योगी, अध्यात्मिक नेते, तत्वज्ञ, लेखक, वक्ते आणि कवी आचार्य श्री महाप्रज्ञ यांचा जन्मदिन.
१९२२ : के. असिफ हिन्दी चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व पटकथालेखक (मृत्यू: ९ मार्च १९७१)
१९४६ : अमेरिकेचे विद्यमान राष्ट्राध्यक्ष डॉनल्ड ट्रम्प यांचा जन्मदिन.
१९५५ : सुप्रसिद्ध भारतीय हिंदी चित्रपट व दूरदर्शन मालिका अभिनेत्री, गायक, मनोरंजन निर्माता, टीव्ही टॉक शो होस्ट आणि भारतीय जनता पक्षाच्या सदस्या किरण अनुपम खेर यांचा जन्मदिन.
१९५९ : लोकप्रिय भारतीय तेलगु भाषिक वक्ता व सनातन धर्मीय भाष्यकार चगंती कोटेश्वरा राव यांचा जन्मदिन.
१९६७ : प्रसिद्ध भारतीय अब्जाधीश उद्योगपती आणि आदित्य बिर्ला समूहाचे अध्यक्ष कुमार मंगलम बिर्ला यांचा जन्मदिन.
१९६८ : प्रसिद्ध भारतीय महाराष्ट्रीयन राजकारणी तसचं, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे संस्थापक, अध्यक्ष राज ठाकरे यांचा जन्मदिन.
१९६९ : साली प्रसिद्ध जर्मन माजी व्यावसायिक टेनिसपटू स्टेफनी मारिया यांचा जन्मदिन. त्यांनी आपल्या कारकिर्दीत एकूण २२ ग्रँड स्लॅम एकेरीचे जेतेपद जिंकले आहे.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८२५ : पिअर चार्ल्स एल्फांट वॉशिंग्टन शहराचे रचनाकार फ्रेन्च अमेरिकन वास्तुविशारद आणि स्थापत्य अभियंता (जन्म: ९ ऑगस्ट १७५४)
१९१६ : गोविंद बल्लाळ देवल आद्य मराठी नाटककार, स्वतंत्र मराठी लेखन आणि इंग्रजी, फ्रेन्च व संस्कृत नाटकांची भाषांतरे इ. अनेक प्रकार त्यांनी हाताळले होते. (जन्म: १३ नोव्हेंबर १८५५)
१९२० : मॅक्स वेबर जर्मन अर्थशास्त्रज्ञ आणि समाजशास्त्रज्ञ (जन्म: २१ एप्रिल १८६४)
१९४६ : जॉन लोगीबेअर्ड, ब्रिटिश शास्त्रज्ञ, आद्य दुरचित्रवाणी संशोधक.
१९६१ : प्रसिद्ध भारतीय नोबल पारितोषिक वेजेते भौतिकशास्त्रज्ञ सी. वी. रमण यांचे शिष्य भौतिकशास्त्रज्ञ सर करिमानीक्कम श्रीनिवास कृष्णन यांचे निधन.
१९८९ : सुहासिनी मुळगांवकर अभिनेत्री व संस्कृत पंडित, मराठी रंगभूमीवरील एकपात्री नाट्यप्रयोगांची सुरुवात त्यांनी केली. ३१ जानेवारी १९६० रोजी 'सौभद्र' नाटकाचा पहिला एकपात्री प्रयोग त्यांनी केला. या नाटकाचे त्यांनी विक्रमी ५०० प्रयोग केले. (जन्म: ????)
२००७ : कुर्त वाल्ढहाईम संयुक्त राष्ट्रांचे चौथे सरचिटणीस (जन्म: २१ डिसेंबर १९१८)
२०१० : मनोहर माळगावकर इंग्रजी लेखक (जन्म: १२ जुलै १९१३)
२०११ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित रुद्रिणा वादक भारतीय संगीतकार असद अली खान यांचे निधन.
२०२० : बॉलीवूड एक्टर सुशांत सिंग राजपुत यांच निधन.

# मतदारांची नावे केंद्रीकृत स्वरूपात समाविष्ट किंवा वगळण्याची कोणतीही तरतूद नाही-मुख्य निवडणूक अधिकारी

मुंबई । प्रतिनिधी

भारतीय निवडणूक कायद्यांनुसार, मतदारांची नावे केंद्रीकृत स्वरूपात समाविष्ट किंवा वगळण्याची कोणतीही तरतूद नाही. लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० व मतदार नोंदणी नियम, १९६० नुसार, मतदारयादी मतदानकेंद्रनिहाय तयार करण्यात येते. राज्यभरातील २८८ मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी () ही यादी जवळपास एक लाख मतदान केंद्रस्तरीय अधिकारी () यांच्या मदतीने क्षेत्रीय पडताळणी करून तयार केली. या प्रक्रियेत सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांशी, सतत माहितीची देवाणघेवाण केली जाते. आक्षेप घेण्यासाठी आणि अपील करण्यासाठी भरपूर संधीही दिली जाते. मतदारयादीत नावांची भर घालणे किंवा वगळणे याबाबत काही अतिशयोक्त दावे करण्यात आले असल्याचे मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी कळविले आहे.

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकांबाबत प्रसारमाध्यमांमध्ये प्रसिद्ध लेखाच्या अनुषंगाने, काही बाबी स्पष्ट करणे आवश्यक असल्याचेही मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र राज्य यांनी कळविले आहे.ऑगस्ट २०२४ मध्ये, विधानसभा निवडणुकांपूर्वी, विशेष संक्षिप्त पुनरिक्षण करण्यात आले आणि एक लाखाच्या आसपास असलेल्या प्रत्येक मतदान केंद्रासाठी प्रारूप व अंतिम मतदार यादींच्या (सॉफ्ट आणि हार्ड कॉपी) प्रती सर्व मान्यताप्राप्त पक्षांना प्रदान करण्यात आल्या होत्या.

महाराष्ट्रातील मतदारसंख्येच्या वाढीबाबत लेखातील माहिती दिशाभूल करणारी आहे. वास्तविक माहिती पुढीलप्रमाणे आहे :

२०१९ च्या विधानसभा निवडणुकांपासून २०२४ च्या लोकसभा निवडणुकांदरम्यान १.३९ कोटी नावांची भर पडली, तर १.०७ कोटी नावांची वजाबाकी झाली. त्यामुळे एकूण निव्वळ वाढ ३२.२५ लाख मतदारांची झाली.

२०२४ लोकसभा ते २०२४ विधानसभा निवडणुका या काळात ४८.८२ लाख नवीन नावे जोडली गेली, आणि ८ लाख वगळली गेली. त्यामुळे निव्वळ वाढ ४०.८१ लाख इतकी होती. त्यात १८ ते २९ वयोगटातील २६ लाखांहून अधिक नवमतदार होते.

एकूण भर ( ) ही २०१९ ते लोकसभा २०२४ मध्ये १.३९ कोटी, आणि लोकसभा २०२४ ते विधानसभा २०२४ मध्ये ४८.८२ लाख इतकी होती.

मतदारांची संख्या प्रक्षेपित प्रौढ लोकसंख्येपेक्षा अधिक का आहे यासंदर्भातही स्पष्टीकरण आवश्यक असून कोणतेही आकडेवारीचे साधन हे केवळ सांख्यिकीय अंदाजासाठी असते. मतदार नोंदणी ही प्रत्यक्ष फॉर्म्स, क्षेत्रीय पडताळणी, आणि कायद्याने ठरवलेल्या प्रक्रियेनुसार निर्णय घेऊन केली जाते. ही प्रक्रिया संपूर्ण पारदर्शक असते आणि सर्व मान्यताप्राप्त पक्षांशी यामध्ये सातत्याने समन्वय साधला जातो. मतदारयाद्यांचे पुनरिक्षण करताना प्रत्येक राजकीय पक्षाने बूथ लेव्हल एजंट () नेमलेले असतात. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने महाराष्ट्रात २८,४२१ बीएलए नियुक्त केले होते. निवडणुकीचे निकाल लागेपर्यंत या एजंटांकडून किंवा भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या उमेदवारांकडून कोणतीही गंभीर तक्रार प्राप्त झालेली नाही. ही बाब निवडणुकीनंतरच उपस्थित केली गेली आहे.

मतदार याद्यांचे वाटप :

मतदार यादी दरवर्षी सहभागात्मक पद्धतीने पुनरिक्षणाद्वारे अद्ययावत केली जाते. या प्रक्रियेत प्रारूप आणि अंतिम स्वरूपातील यादी सर्व मान्यताप्राप्त पक्षांना विनामूल्य दिली जाते. हीच प्रक्रिया २००९, २०१४, २०१९ आणि २०२४ मध्येही राबवण्यात आली होती आणि यादी पक्षांना देण्यात आली होती.

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीसाठी वापरण्यात आलेली संपूर्ण मतदारयादी आयोगाच्या वेबसाइटवर सार्वजनिकरित्या डाउनलोडसाठी उपलब्ध आहे.

मतदार नोंदणी नियम १९६० च्या नियम ३३ नुसार कोणतीही व्यक्ती, संबंधित जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडे अर्ज करून निर्धारित शुल्क भरून मतदारयादीची प्रत मिळवू शकतो.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने () नोव्हेंबर २०२४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकांनंतरही अशाच स्वरूपाचे मुद्दे उपस्थित केले होते. निवडणूक आयोगाने दि. २४ डिसेंबर २०२४ रोजी यावर सविस्तर उत्तर दिले आहे. त्या उत्तराची प्रत आयोगाच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे.

## तलाठी, मंडळ अधिकाऱ्यांच्या त्वरित बदल्या करा-भाई नारायण गोले

माजलगाव । प्रतिनिधी



तालुक्यात काही तलाठी, मंडळाधिकारी हे अनेक दिवसांपासून माजलगाव तालुक्यात ठाण मांडून बसलेले आहेत त्यामुळे त्यांना तालुक्यातील इतंबूत माहिती झाली असून ते सज्जावर जात नाहीत अथवा शेतकऱ्यांचे फोन देखील घेत नाहीत तसेच माजलगाव शहरात खाजगी कार्यालये थाटुन खाजगी व्यक्तीच्या ताब्यात शासकीय दस्तऐवज देऊन आपल्या कर्तव्यात कसूर करुन खाजगी व्यक्तीच्या माध्यमातून प्रचंड माया जमवत आहेत या बाबत वरिष्ठांकडे शेतकरी कामगार पक्षाने अनेक तक्रारी करून देखील केवळ वरिष्ठाची मर्जी सांभाळत असल्याने त्यांच्यावर कुठलीही कार्यवाही केली जात नाही, याशिवाय काही तलाठी मंडळ अधिकारी तर तहसीलदार व इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांना वाळू,मुरूम यासह विविध कामात पैसे गोळा करून देतात, त्यामुळे वरिष्ठ त्यांची बदली करायला धजत नाहीत उलट पक्षी त्यांची बदली होऊ नये यासाठी सातत्याने प्रयत्न करत असतात, तसेच शेतकऱ्यांना शुल्लक शुल्लक कामासाठी अनेक खाजगी कार्यालयाचे उंबरठे झिजवायला भाग पाडतात त्यामुळे शेतकरी देखील तलाठी मंडळ अधिकाऱ्याच्या जाचाला कंटाळले आहेत म्हणून गेल्या अनेक वर्षापासून माजलगाव येथे कार्यरत असलेले मंडळ अधिकारी तलाठी यांच्या बदल्या करणे कामी माजलगाव येथील उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांच्याकडे शेतकरी कामगार पक्षाचे वतीने निवेदनाद्वारे मागणी केली असून बदल्या न केल्यास तिव्र आंदोलन करण्याचा इशाराही शेतकरी कामगार पक्षाचे वतीने दिला असून निवेदनावर शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई अ‍ॅड.नारायण गोले पाटील,भाई श्रीराम शेवाळे,भाई श्रीराम कोरडे,भाई मुंजा पांचाळ,भाई लक्ष्मण आप्पा चव्हाण,भाई भास्कर कांबळे, भाई चांगदेव शेजुळ,भाई साळुजी हांडे,भाई कडाजी नावडकर आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## थोडक्यात




### वंचित बहुजन आघाडीच्या वतीने शिबिर

वंचित बहुजन आघाडी जिल्हा उपाध्यक्ष सचिन मेघडंबर यांच्या वाढदिवसानिमित्त प्रतिवर्षीप्रमाणे यावर्षीही रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते या रक्तदान शिबिराला राजकीय मंडळी सामाजिक कार्यकर्ते पत्रकार बांधव विविध पक्षातील मान्यवर यांनी भेट दिली. यामध्ये वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर कवठेकर, बीड शहराध्यक्ष लखन काका जोगदंड मिलिंद सरपते पाटोदा तालुका अध्यक्ष बाळासाहेब गायकवाड पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष सोमीनाथ कोल्हे तसेच पाटोदा तालुक्यातील सर्व पत्रकार संघटनेचे सर्व अध्यक्ष व त्यांचे सर्व सदस्य शिवशंभो जिल्हा अध्यक्ष लखन वीर तालुका अध्यक्ष अनिकेत जावळे जिल्हा प्रसिद्धीप्रमुख दत्ता वाघमारे इत्यादी मान्यवर उपस्थित होते पाटोदा तालुक्यातील युवकांनी या रक्तदान शिबिराला चांगला प्रतिसाद दिला फक्त यावर्षीही ३३ लोकांनी रक्तदान केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितीन इंनकर यांनी केले तर आभार प्रदर्शन दीपक थोरात यांनी केले.

### माजी जिल्हा परिषद सदस्य गणेशराव सोळंके यांचे निधन

माजलगाव । प्रतिनिधी



तालुक्यातील गंगामसला येथील प्रतिष्ठित शेतकरी व गंगामसला गटाचे पहिले जिल्हा परिषद सदस्य व विविध पदावर कार्यरत होऊन तालुक्याच्या राजकारणामध्ये सदैव अग्रेसर असणारे श्री गणेशराव हरिभाऊ सोळंके यांचे वयाच्या ९८ व्या वर्षी दि १३ जुन शुक्रवार रोजी निधन झाले.त्यांच्यावर सायंकाळी ६:३० वाजता शहरातील मंगलनाथ स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात मुलगा माजी सरपंच श्ज्ञानेश्वर सोळंके, दोन मुली,सुन नातवंडे व पणतू असा परिवार आहे

## वहालीच्या दवाखान्याची डागडुजी निकृष्ट दर्जाची चौकशीची मागणी

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील वहाली येथील पशुवैद्यकीय दवाखान्याची डागडुजी ही निकृष्ट दर्जाची केली असून त्यामुळे सध्या दवाखाना दुरुस्ती अर्धवट केल्यामुळे पावसाळ्यात गळती लागली असून तरी याची चौकशी करून संबंधितावर कारवाई करा अशी मागणी सरपंच अशोक आजिनाथ पवार यांनी केली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की तालुक्यातील वहाली येथील पशुवैद्यकीय दवाखान्याची दुरुस्ती सन २०२४-२५ मध्ये त्याची डागडुजी करण्यात आली होती हे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होते व हे काम अपूर्ण अवस्थेत असुन अपूर्ण अवस्थेत निधी उचलला होता तरी या ठिकाणच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित अहवाल ग्रामपंचायतला दाखल करावा यापूर्वी कार्यालयास वारंवार पत्रव्यवहार केला असून मात्र याची कसलीही दखल उपअभियंता जिल्हा परिषद बांधकाम विभाग पाटोदा यांनी घेतली नसून तरी याची चौकशी करून संबंधितावर कारवाई करून दवाखाना दुरुस्ती परत करावी पावसाळ्यात गळणार नाही याची दखल घ्यावी अशी मागणी वहालीचे सरपंच अशोक अजिनाथ पवार यांनी निवेदनाद्वारे केली आहे

## राज्यस्तरीय जी-चॅम्प अबॅकस स्पर्धेत सद्गुरु अकॅडमीचे दमदार यश

बीड । प्रतिनिधी

राज्यस्तरीय जी-चॅम्प अबॅकस स्पर्धेत बीडच्या सद्? गुरु अकॅडमीने मोठे यश मिळवत, शिक्षण क्षेत्रात आपली ठसा उमटवला आहे. दिनांक ८ जून रोजी संभाजीनगर येथे झालेल्या या प्रतिष्ठित स्पर्धेत आदित्य नगरी, भक्ती कन्स्ट्रक्शन बीड येथील सद्गुरु अकॅडमीच्या २१ जणांच्या विद्यार्थ्यांच्या चमूने सहभाग घेतला होता.




या स्पर्धेत मिहीर महेश भट, साईराज गणेश पवार, प्रीती रवींद्र जगताप, श्रेयश जगदीश डांगे, उत्कर्ष उत्तरेश्वर घुमरे, विश्वेश किशोर कोळपकर या सहा विद्यार्थ्यांनी 'सुपरस्टार' ट्रॉफी पटकावत सर्वोच्च सन्मान मिळवला. तसेच सृष्टी रामदास आघाव, अबोली अमोल माने, समर प्रकाश भिंगळे यांनी प्रथम क्रमांक, आराध्या संदीप गुंजाळ, गणेश महेश साळप्पा, प्रभास गोविंद शिंदे, श्रुती जगदीश डांगे यांनी द्वितीय क्रमांक आणि अखिलेश रामदास आघाव, गौरव सतीश बोबडे यांनी तृतीय क्रमांक मिळवून आपली प्रतिभा सिद्ध केली. सुमारे ७५% विद्यार्थ्यांनी कमी वेळेत १००% अचूक गणनापद्धतीने आपले पेपर पूर्ण करत स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली. या यशामुळे सद्? गुरु अकॅडमीचे नाव राज्यस्तरावर झळकले असून, बीड शहरासाठीही हे एक अभिमानाचे क्षण ठरले आहेत. या यशामागे मार्गदर्शक शिक्षिका सौ. शैलेजा गणेश वाघ व सौ. स्वाती विठ्ठल चिवटे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या उज्ज्वल यशाबद्दल सर्व पालक आणि नागरिकांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



माजलगाव:- महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने माजलगाव नगरपालिकेतील सर्वे नंबर ३७१ मधील ३२५० स्क्वेअर फुट जागा स्वर्गीय बाळासाहेब भवनासाठी मिळाली असून सदरील जागेचा पी टी आर.संसदरत्न खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांच्याकडे सुपूर्द करताना शिवसेना अल्पसंख्यांक प्रदेशाध्यक्ष तथा पाथरीचे शिवसेना नेते सईद खान व माजलगाव शहर प्रमुख धनंजय पापा सोळंके

## शहरातील रस्त्याची जीओ कंपनीकडून तोडफोड-प्रकाश वडमारे

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील मोंढा नाका ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते मोमीन पुरा मार्गे बार्शी नाका ते तेलगाव नाका, शासकीय दुध डेअरी ते सोमेश्वर मंदिरापासून छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते नगर नाका या परिसरातील सिमेंट रस्त्याची तोडफोड करुन व पाईपलाईनची नासधुस करीत जीओ कंपनीकडून बीड नगर परिषद व राष्ट्रीय महामार्ग उपविभाग सा.बां.विभाग बीड यांच्याशी संगनमत करुन डिजीटल फायबर (ओएफसी) केबल टाकण्याचे काम जीओ कंपनीच्या गुत्तेदाराकडून नियम पायदळी तुडवून करण्यात येत आहे. जीओ कंपनीकडून केबल टाकण्याच्या नावाखाली गेल्या अनेक दिवसापासून सिमेंट रोडवर सहा फुटाचे खड्डे खोदून ठेवले आहेत. खोदलेले खड्डे तात्काळ बुजविण्यात यावेत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते प्रकाश वडमारे यांनी केली आहे.

बीड शहरातील सर्व परिसरातील सिमेंट रस्ते खोदून ठेवल्यामुळे नागरीकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. जीओ कंपनीने केबल टाकण्यासाठी न.प.बीड व राष्ट्रीय महामार्ग उपविभाग बीड यांच्याकडून परवानगी घेतली आहे का? घेतली असेल तर खड्ड्याच्या बाजुला खड्डा खोदण्याचे फलक किंवा काम सुरु असल्याचे फलक लावण्यात आले नसल्यामुळे अपघात होवून जीवीत हाणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जीओ कंपनीकडून खड्डे खोदून ठेवल्यामुळे पावसाचे पाणी खड्ड्यात साचल्यामुळे अनेक वाहने खड्ड्यात पडून सर्व सामान्य नागरीक जखमी होतांना दिसून येत आहेत.

बीड शहरातील खड्डे जीओ कंपनी एखाद्या नागरीकाचा जीव गेल्यावर बुजविणार आहे का? जीओ कंपनीने खोदलेला रस्ता तात्काळ दुरुस्त करुन घ्यावा नसता दुरसंचार विभाग भारत सरकार तसेच जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे तक्रार करण्यात येईल अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते प्रकाश वडमारे यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

## यशस्वींचा भव्य सन्मान सोहळा नवयुवकांसाठी प्रेरणेचा नवा झरा!

पाटोदा । प्रतिनिधी

२०२५ परीक्षेत यशस्वी झालेल्या १५० हुन अधिक विद्यार्थ्यांचा पुण्यातील कृषी महाविद्यालयाच्या शिरनामे सभागृहात भव्य सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला आहे. १५ जून २०२५ रविवारी सकाळी १० वाजता सुरू होणाऱ्या या कार्यक्रमाचे आयोजन हिरकणी सामाजिक प्रतिष्ठाण, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने करण्यात येत आहे.या गौरव सोहळ्याचे उद्घाटन माननीय न्यायमूर्ती मा. अभय ठिपसे (उच्च न्यायालय, इलाहाबाद) यांच्या हस्ते होणार असून, ते परीक्षेतील यशाला केवळ एक परीक्षेचा टप्पा न समजता सामाजिक जबाबदारीची नवी सुरुवात असल्याचा संदेश देतील. कार्यक्रमाचे अध्यक्ष महेश भागवत, अतिरिक्त पोलीसमहासंचालक, तेलंगणा राज्य असतील. २५ वर्षांच्या प्रशासन अनुभवातून ते तरुणांना ''सिस्टम बदलण्याची ताकद तुमच्यात आहे'' असा मनोधर्म देणार आहेत.या कार्यक्रमात महाराष्ट्रातील विविध प्रशासनिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यामध्ये जिल्हा पोलीस अधीक्षक संदिपसिंग गील (), डेप्युटी कमिश्नर नितिश पाथोडे, सहाय्यक आयुक्त श्रीकांत कुलकर्णी, सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुभाष भालेकर, संचालक राजेश पावडे, अध्यक्ष अ‍ॅड. हेमंत झंजाड, जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, संपादक प्रकाश पोहरे, अप्पर जिल्हाधिकारी बप्पासाहेब थोरात, मुंबई उच्च न्यायालयाचे अ‍ॅड. पी.पी. मोरे, तहसिलदार रमेश मुंडलोड, तसेच आकाश माघसवाड यांचा समावेश आहे.हा सन्मान सोहळा आर्थिक व सामाजिक अडचणींवर मात करून यशस्वी झालेल्या ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांचा समावेश असलेला एक प्रेरणादायी मंच आहे. अनेकांनी आपल्या कठोर मेहनतीतून आणि आत्मविश्वासातून सारखी कठीण परीक्षा यशस्वी केली आहे. एक विद्यार्थी म्हणाला, '' म्हणजे केवळ परीक्षा नाही, तर आत्मशोध आणि स्वप्नपूर्तीची यात्रा आहे.''

हिरकणी सामाजिक प्रतिष्ठाणाचे अध्यक्ष अ‍ॅड. तात्यासाहेब घुमरे (पवार) यांनी सांगितले, ''आम्ही फक्त अधिकारी घडवत नाही, तर जबाबदार आणि संवेदनशील नागरिक तयार करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहोत. या सन्मान सोहळ्यामुळे तरुणांमध्ये नवीन ऊर्जा आणि उत्साह निर्माण होईल.''हा गौरव सोहळा केवळ यशस्वी उमेदवारांचा सन्मान नसून, नव्या पिढीला सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देणारा आणि प्रेरणा देणारा एक नवा पर्व आहे.


यामुळे महाराष्ट्रातील तरुणांना संघर्षातून यशाकडे वाटचाल करण्यासाठी मार्गदर्शन मिळेल, अशी अपेक्षा आहे.सर्व इच्छुक तरुणांनी आणि कुटुंबांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून या प्रेरणादायी सोहळ्याचा अनुभव घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## अर्चनाताई पाटील, अ‍ॅड राज पाटील यांना पुरस्कार जाहीर

### १५ जून रोजी अहिल्या नगर येथे पुरस्काराचे वितरण

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील तिगाव चे उच्च शिक्षीत सरपंच सौ अर्चनाताई पाटील यांनी गावात विविध विकासकामे केल्याने त्यांना आदर्श सरपंच तर व सामाजिक कार्यकर्ते तथा लढा दुष्काळी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा वृक्ष मित्र ऍड राज पाटील यांनी तालुक्यात लाखो वृक्ष लागवड केली आहे व शालेय साहित्य तथा पुस्तक वाटप केल्याने त्यांना सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने वृक्ष संवर्धन मित्र हा पुरस्कार जाहीर झाला आहे या पुरस्काराचा वितरण सोहळा अहिल्यानगर येथे १५ जुन रोजी आदर्श सरपंच भास्कर पेरे पाटील, खासदार भाऊसाहेब वाघचौरे,यादवराव पावशे,आ रोहित पवार अदी मान्यवरांच्या शुभहस्ते पार पाडणार आहे.सरपंच सौ अर्चनाताई पाटील व अ‍ॅड राज पाटील यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनचा वर्ष होत आहे.



तालुक्यातील तिगाव हे १३ वस्त्यांनी विखुरलेले गाव आहे. या सर्व वस्त्यावर शासनाच्या विविध योजना राबऊन गावाचा कायापालट केलेला आहे. विकास कामाची सुरुवात सर्व वस्त्यावर स्वखर्चातुन १७ किलोमीटर गावाला जोडणारे रस्ते केले आहेत. सर्व वस्त्यावरील सिमेंट रस्ते नाली,पाणी, पथदिव्यांची सोय केली आहे.सर्व वस्त्यावरील जिल्हा परिषद शाळेला रंगरंगोटी करणे,शाळा डिजिटल करणे,ई लर्निंग करणे,शाळेच्या ग्राउंडवर पेवर ब्लॉक बसवणे, शाळेभोवती वृक्ष लागवड करणे अधिविकास कामे केल्याने गावचे रुपडे बदलून गेले आहे. दरवर्षी ग्रामपंचायतच्या उच्च शिक्षित सरपंच सौ अर्चनाताई राज पाटील यांच्या वतीने संक्रातीला महिलांना वाण म्हणून झाडांची व पुस्तकांची वाटप केली जाते. गावात जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणात केल्याने गाव टँकर मुक्त व दुष्काळ मुक्तीकडे वाटचाल करत आहे. दुष्काळामध्ये आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना खत बी बियाणे वाटप, कोरोना मध्ये किराणा किटचे वाटप, मोठ्या प्रमाणात वृक्षतोडीमुळे जमिनीची धूप मोठ्या प्रमाणात होत चाललेली आहे व ऑक्सिजन मिळण्याचे प्रमाणही कमी झाले आहे. कोरोना काळात याचा प्रचिती आल्याने झाडे लावा झाडे जगवा ही संकल्पना घेऊन संपूर्ण तालुक्यामध्ये लाखो वृक्षांचे वाटप केले नाही तर ते जगविलेही आहेत.या सर्व सामाजिक कार्याची दखल सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्य यांनी घेऊन सरपंच सौ अर्चनाताई पाटील आदर्श सरपंच म्हणून तर ऍड राज पाटील यांना वृक्ष संवर्धन मित्र हा पुरस्कार जाहीर केला आहे.पुरस्काराचा वितरण सोहळा अहिल्यानगर येथे १५ जुन रोजी आदर्श सरपंच भास्कर पेरे पाटील, खासदार भाऊसाहेब वाघचौरे,यादवराव पावशे,आ रोहित पवार अदी मान्यवरांच्या शुभहस्ते पार पाडणार आहे.सरपंच सौ अर्चनाताई पाटील व अ‍ॅड राज पाटील यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनचा वर्ष होत आहे. अर्चना राज पाटील यांना आदर्श सरपंच पुरस्कार मिळाला आहे तर राज पाटील यांना वृक्ष संवर्धक मित्र म्हणून पुरस्कार जाहीर झाला आहे. पुरस्कार मिळाल्याने तालुका भरात पुन्हा जोमाने काम करण्या ऊर्जा मिळाली आहे , पूर्वीही राज्यस्तरीय अनेक पुरस्कार राज पाटील यांना मिळाले आहेत. हा पुरस्कार जनसेवेची पावती आपल्याला मिळत असल्याची भावना ऍडव्होकेट राज पाटील यांनी सांगितले

## अ.जा. अ.ज. प्रवर्गातील शेतकऱ्यांनी ठिबक तुषार घटकासाठी अर्ज करावेत

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रीय कृषी विकास योजना - प्रति थेंब अधिक पिक योजना अंतर्गत महाडीबीटी पोर्टलवर अनु.जाती व अनु.जमाती प्रवर्गातील शेतकरी बांधवांनी ठिबक, तुषार घटकासाठी अर्ज करावेत. असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, बीड एस.एम.साळवे यांनी केले आहे. राष्ट्रीय कृषी विकास योजना - प्रति थेंब अधिक पिक योजनेतर्गत ठिबक/ तुषार घटकासाठी महाडीबीटी पोर्टलवर अनु.जाती व अनु.जमाती प्रवर्गातील शेतकऱ्याकरिता ९० टक्के पर्यंत अनुदान उपलब्ध आहे. या संधीचा मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा.अनुदानाची मर्यादा खालील प्रमाणे आहे.शेतकरी वर्गवारी, राष्ट्रीय कृषि विकास योजना - प्रति थेंब,अधिक पिक योजना, मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजना,बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना, डॉ.बाबासाहेब कृषि स्वावलंबन योजना.अल्प व अत्यल्प



भूधारक (२ हे.पर्यंत क्षेत्र ) ५५ टक्के, २५ टक्के, १० टक्के, ९० टक्के, बहु भूधारक (२ हे.पेक्षा जास्त क्षेत्र ) ४५ टक्के ३० टक्के १५ टक्के ९० टक्के.१.ठिंबक तुषार घटकामुळे उत्पादनात व उत्पादकतेत मोठ्या प्रमाणात वाढ होऊन आर्थिक स्तर २.पाण्याचा काटेकोर वापर झाल्याने तणांची वाढ रोखण्यास मदत होते.३.सिंचन क्षेत्रात वाढ होईल. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा.

राज्य लोकतंत्र
शनिवार, दि.१४ जुन २०२५


# परमेश्वरावर विश्वास ठेवा अंधविश्वास ठेऊ नका - प. पूज्य प्रदीप मिश्राजी

## आज चाकरवाडी येथे शिवमहापुराण कथा व अखंड हरिनाम सप्ताह सांगता होणार

**चाकरवाडी । प्रतिनिधी**

**शिव परमेश्वरावर विश्वास ठेवा परमेश्वरावर ठेवलेला विश्वास तुमच्यात आत्मविश्वास निर्माण करेल, त्या आत्मविश्वासाच्या जोरावर तुमच्या आयुष्यात कार्य सिद्धी होईल, परंतु फक्त अंधविश्वास ठेऊ नका. अंधविश्वास तुमच्या आयुष्याच नुकसान करतो. त्यामुळे प्रत्यकाने शिव परमेश्वरावर विश्वास ठेवावा असे प्रतिपादन शिवमहापुराण कथेत प. पूज्य प्रदीप मिश्राजी यांनी केले. दरम्यान आज शनिवार रोजी चाकरवाडी येथे सुरू असलेला अखंड हरिनाम सप्ताह व शिवपुराण कथेचा सांगता समारंभ होणार आहे.**

चाकरवाडी येथे विषया शतकातील महान संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या कृपाशीर्वादाने व तपो निधी गुरुवर्य महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व शिवपुराण कथेत प्रदीप मिश्रा बोलत होते बोलत. यावेळी पुढे बोलताना मिश्राजी म्हणाले की, शिव, विष्णू, नारायण, पांडुरंग, कृष्ण, कन्हैया, माऊली दादा महाराज कोणताही नामस्मरण करा सर्व एकच आहे.

कोणाची प्रगती पाहिल्यावर आपण त्याच्या पेक्षा मोठी झेप घ्यावी परंतु कोणाविषयी जळाऊ वृत्ती ठेऊ नये, कोणी एखादी गाडी घेतली तर आपण मोठी गाडी घ्यावी, परंतु त्याच्या गाडीवर कोणीही जळू नये हि जळाऊ वृत्ती संपवणे गरजेचे आहे. त्यामुळे अध्यात्म गरजेचे असून शिवभक्ती करणे काळाची गरज आहे



शिवभक्ती केल्याने मानवी आयुष्यात आनंद निर्माण होईल व देवावरील भक्ती मुळे वृत्ती माणसातून कमी होईल त्यामुळे श्रद्धापूर्वक शिवभक्ती करा असे प्रतिपादन शिवमहापुराण कथेत प पूज्य प्रदीप मिश्राजी यांनी केले.

आज होणारे कार्यक्रम

आज दि १४ जून शनिवार रोजी चाकरवाडी येथे विसाव्या शतकातील महान संत सद्गुरु ज्ञानेश्वर महाराज माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यात तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य श्री महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेल्या शिवमहापुराण कथेची व अखंड हरिनाम सप्ताह सांगता होणार आहे. श्री प पूज्य प्रदीप मिश्राजी सिहोर वाले यांच्या शिवमहापुराण कथेची सांगता आज सकाळी ८ वा. सुरू होणार आहे. शिव महापुराण कथा संपल्यावर माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यात अखंड हरिनाम सप्ताह मध्ये काल्याचे कीर्तन श्री ह. भ. प संदीपान महाराज हासेगावकर श्री जोग महाराज वरकरी शिक्षण संस्था श्री क्षेत्र आळंदी देहू यांचे ११.३० ते १ वाजेपर्यंत काल्याचे कीर्तन होईल त्या नंतर महाप्रसादाची महापांगत होईल.

शिवमहापुराण कथेस मुख्य उपस्थिती शंकराचार्य शृंगेरी पीठ मान्यता प्राप्त आचार्य अभिनव विद्या नरसिंह भरती स्वामी महाराज श्री क्षेत्र शृंगेरी हे आपल्या शिष्य गणा समवेत माऊली दादाच्या समाधीच दर्शन घेऊन प पूज्य प्रदीप मिश्राजी यांच्या शिवमहापुराण कथेस उपस्थित राहून कथेस आलेल्या भाविक भक्तांना आशीर्वाद दिले.

### मान्यराची भेट

मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील, माजी मंत्री सुरेश धस, माजी मंत्री अशोक पाटील, खासदार रजनीताई पाटील, खा. बजरंग सोनवणे, माजी नगराध्यक्ष पापा मोदी, अनेक नामांकित दैनिकाचे संपादक,उपसंपादक,वृत्तवाहिनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# जिजाऊ माँसाहेब पुण्यतिथीनिमित्त डॉ.नम्रताराजे भोसले यांचे व्याख्यान

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या ३५१ व्या पुण्यतिथी निमित्त राजे लखोजीराव जाधव यांच्या वंशाच्या वतीने जन्मस्थळ मातृ तीर्थ शिंदखेड राजा ते पाचाड किल्ले रायगड अशी जिजाऊ रथ यात्रा दिनांक १४ जून ते १७ जून दरम्यान दरवर्षी आयोजित करण्यात येते. याही वर्षी जिजाऊ माँसाहेब यांच्या पुण्यतिथी निमित्त जिजाऊ रथयात्रा १४ जून शनिवार रोजी ०४:३० वा. साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे, छत्रपती शिवाजी महाराज चौक दोन्ही महापुरुषांना अभिवादन करून मुक्ताई चौक, शिवाजी धांडे नगर येथे महिला व नागरिकांच्या वतीने जिजाऊ रथयात्रेचे पूजन व स्वागत होऊन आशीर्वाद मंगल कार्यालय बार्शी रोड येथे सायंकाळी ९:०० वाजता डॉ.नम्रता राजे भोसले (महाडिक ) सदस्या, छत्रपती शिवाजी महाराज चरित्र साधने प्रकाशन समिती महाराष्ट्र शासन, महिला प्रमुख - इतिहास संकलन समिती ,छत्रपती संभाजी नगर,



पोस्ट डॉक्टरल फेलो आयसीएसएसआर ,नवी दिल्ली ,यांचे माँसाहेब जिजाऊंच्या जीवनावर आशीर्वाद मंगल कार्यालय बार्शी रोड बीड येथे जाहीर व्याख्यान आयोजित करण्यात आलेले आहे. तरी सर्वांनी अभ्यासपूर्ण व्याख्यानासाठी उपस्थित राहावे असे जिजाऊ माँसाहेब रथयात्रा संयोजन समितीच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# शेतातील विद्युत तारेचा करंट लागून तरुणाचा दुर्दैवी मृत्यू

अंबाजोगाई । प्रतिनिधी

तालुक्यातील घाटनांदूर गावात आज शुक्रवार, दि. १३ रोजी सकाळी ९ वाजताच्या सुमारास करंट लागून २४ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या अपघातामुळे संपूर्ण गावात शोककळा पसरली असून, हळहळ व्यक्त केली जात आहे.



मृत तरुणाचे नाव धनंजय राजाभाऊ जाधव (देशमुख) (वय २४) असून तो घाटनांदूर येथील रहिवासी होता. दररोजप्रमाणे तो सकाळी शेतामध्ये काम करण्यासाठी गेला होता. यावेळी शेतामध्ये असलेल्या विद्युत प्रवाहाच्या तारेला स्पर्श झाल्यामुळे त्याला जोराचा विद्युत झटका बसला. यात तो जागीच कोसळला. त्यानंतर तातडीने त्याला स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय, अंबाजोगाई येथे दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले.धनंजय हा अत्यंत शांत, हसतमुख आणि सर्वांशी मनमिळावून वागणारा युवक म्हणून ओळखला जात होता. तो आपल्या कुटुंबातील एकुलता एक मुलगा होता. त्याच्या अचानक जाण्यामुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. सर्वत्र या घटनेबद्दल हळहळ व्यक्त केली जात आहे.



**बीड - आदर्श शिक्षक पंडित मोकाशे, योगेश थोरवे, प्रा. जोगदंड यांनी दैनिक राज्य लोकतंत्र कार्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांचा सत्कार कार्यकारी संपादक अशोक खाडे, विशाल साळुंके, अनिल जाधव यांनी केला.**

# धनंजय मुंडे यांनी घेतली जिल्हाधिकारी जॉन्सन यांची भेट



बीड । प्रतिनिधी

माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी आज परळी वैजनाथ विधानसभा मतदारसंघातील विविध प्रलंबित कामे, प्रस्ताव यांचा विविध महत्त्वाच्या विषयाच्या अनुषंगाने आज बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट घेतली. यावेळी दोघांमध्ये परळी मतदान संघातील तसेच जिल्ह्यातील महत्त्वाच्या विषयांवर प्रदीर्घ चर्चा झाली.

**परळी मतदारसंघासह जिल्ह्यातील विविध महत्त्वाच्या विषयांवर प्रदीर्घ चर्चा**

शिरसाळा येथील मंजूर एमआयडीसी मधील उर्वरित जागेची अधिकरण प्रक्रिया लवकर पूर्ण करण्यात यावी तसेच या ठिकाणी पायाभूत सुविधा निर्मितीच्या अनुषंगाने पाठपुरावा करणे याबाबतही यावेळी चर्चा झाली. त्याचबरोबर बसस्थानकाचे काम, कृषी महाविद्यालयाच्या रस्त्याला निधी, धर्मापुरी किल्ल्याचे ◀◀ पान ३ वर

# शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग महाराष्ट्र राज्याचे विद्यमान मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून दि.०६ जून रोजी सकाळी १०:०० वाजता शिवराज्याभिषेक दिन या कार्यक्रमाचे व्हिडोओ कॉन्फरन्सिंगद्वारे ऑनलाईन उद्घाटन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते संपूर्ण महाराष्ट्रातील ४१९ शासकीय आय.टी.आय.मध्ये करण्यात आले.तर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था माजलगाव या संस्थेत देखील यावेळी शिवराज्याभिषेक दिन साजरा करण्यात आला.या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून आ.प्रकाश सोळंके हे उपस्थित होते.मान्यवरांच्या हस्ते छ.शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक प्रतिमेचे पुजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी सोळंके यांनी ३५० वर्षापूर्वी शिवराज्याभिषेक दिन साजरा झाला होता, त्यावेळची परिस्थिती आणि आजची सद्यस्थिती यावर उजाळा देत



उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आयएमसी सोसायटी औ.प्र.सं.माजलगाव चे पदसिध्द सदस्य प्रविण येताळ हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहूणे म्हणून कमलाकर जोशी, तुकाराम येवले, संभाजी शेजूळ हे उपस्थित होते.या कार्यक्रमासाठी ज्ञानवर्धिनी कोचिंग क्लासेसचे संचालक अशोक काळे हे प्रमुख वक्ते म्हणून व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी अशोक काळे यांनी नागरी कर्तव्य व शिष्टाचार या विषयावर उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बाबासाहेब घाटूळ यांनी केले तर प्रास्ताविक एन.पी.पटवी यांनी केले, तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ए.ए.पठाण यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे प्राचार्य एस.ओ.बनगे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.यावेळी संस्थेतील सर्व कर्मचारी आणि सर्व ट्रेडचे प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

# दिंद्रुड येथे माजी आ. बच्चू कडू समर्थनार्थ रास्ता रोको आंदोलन



दिंद्रुड । प्रतिनिधी

शेतकरी संपूर्ण कर्जमाफी सह विविध मागण्यासाठी आणि माजी आमदार बच्चू कडू यांच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शविण्यासाठी काल शुक्रवार (१३ जून) रोजी दिंद्रुड येथे बीड-परळी महामार्गावर प्रहार दिव्यांग संघटना व शेतकऱ्याच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

श्रीक्षेत्र गुरुकुंज मोझरी येथे ८ जून पासून बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांच्या संपूर्ण कर्जमाफीच्या प्रश्नावर आंदोलन सुरू केलेले आहे. परंतु शासनाने त्यांच्या कुठल्याही मागणीची आतापर्यंत दखल न घेतल्याने, प्रहार दिव्यांग संघटनेच्या या आंदोलनाला बळ देण्यासाठी व शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शुक्रवारी संपूर्ण राज्यभरात प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेतर्फे आंदोलन करण्यात आले. येथील आंदोलनाला प्रहार च्या जिल्हा, तालुका स्तरावरील पदाधिकाऱ्यांसह ◀◀ पान ३ वर

# राष्ट्रीय किसान मोर्चाने दिले आ.नमिता मुंदडा यांना निवेदन

## १ जुलैला भारत बंदचा राष्ट्रीय किसान मोर्चाचा इशारा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

संपूर्ण महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यातील २८८ आमदारांना घेराव आंदोलनाच्या अंतर्गत मंगळवार, दिनांक १० जुन रोजी अंबाजोगाई तालुक्याच्या वतीने केज-अंबाजोगाई २३२ विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सौ.नमिताताई मुंदडा यांच्या कार्यालयात जाऊन विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी राष्ट्रीय किसान मोर्चा सहीत शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर सरकारच्या धोरणा विरोधात लढणाऱ्या सामाजिक व राजकीय संघटना सहभागी झाल्या होत्या.



राष्ट्रीय किसान मोर्चा सहीत विविध संघटनांच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, १) सरकारने निवडणुकीपूर्वी आश्वासन दिलेली पीक कर्जमाफी त्वरित देण्यात यावी, २) सोयाबीन, कापूस, धान यासह सर्व शेतीमालाच्या फरकाची रक्कम पेरणी खरीप हंगाम २०२५-२६ सुरू होण्यापूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी, ३) राज्य सरकारने केंद्र सरकारकडे शिफारस केलेल्या हमीभावा मध्ये केंद्र सरकार ४० टक्के वजा करून हमीभाव जाहीर करते यावर राज्यातील सत्ताधारी तसेच विरोधी आमदारांनी आपली भूमिका जाहीर करावी, ४) शेतीपंपाचे सर्व थकीत विज बिल माफ करून नवीन कृषी पंपांना सोलरची सक्ती न करता शेतकऱ्यांना त्वरित वीज कनेक्शन देण्यात यावे, ५) प्रधानमंत्री पिक विमा योजना बंद करून आयआरएमए हा कायदा लागू केला पाहिजे या मागण्यांचे निवेदन मंगळवार, दिनांक १० जुन रोजी आमदार मुंदडा यांना देण्यात आले. यावेळी आ.मुंदडा या उपस्थित नसल्यामुळे त्यांचे ज्येष्ठ सहकारी माजी नगराध्यक्ष महादू मस्के यांनी सदरचे निवेदन स्वीकारले. ◀◀ पान ३ वर

# आष्टी मतदारसंघात आ.सुरेश धस यांच्या प्रयत्नाने पंतप्रधान घरकुल आवास योजनेत १८ हजार घरकुले मंजूर

बीड । प्रतिनिधी

आष्टी,पाटोदा,शिरूर कासार या तिन्ही तालुक्यात पंतप्रधान घरकुल आवास योजना-ग्रामीण अंतर्गत २०२५-२६ करिता १८ हजार ७ लाभार्थ्यांना घरकुले मंजूर झाले आहेत. लाभार्थ्यांनी ग्रामसेवक किंवा ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्याकडे आवश्यक त्या कागदपत्राची पूर्तता करून ऑनलाईन करावेत या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले आहे.

पंतप्रधान घरकुल योजना अंतर्गत घरकुल मंजुरी प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुले मंजूर झाले असून मतदारसंघात ड घरकुल सर्वेक्षणाचे काम सुरू असताना ब सर्वेक्षण बाबत आ.सुरेश धस यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री अजित पवार भेट घेऊन



लक्ष वेधल्याने लाभार्थीच्या घरकुल मंजुरी मध्ये लाभार्थ्यांचा जास्तीचा फायदा असून सर्वाधिक घरकले मंजूर केल्याबद्दल केंद्र सरकार व राज्य सरकारचे आ.सुरेश धस यांनी आभार मानले आहे.यामध्ये आष्टी ७३०२,पाटोदा ५९१५,शिरूर कासार ४७९० तिन्ही तालुक्यात एकूण १८ हजार ७ घरकुले मंजूर झाले असून त्या यादीतील लाभार्थ्यांना लाभ मिळणार आहे.यासाठी ग्रामपंचायतचा जागा उपलब्धेप्रमाणे पीटीआर किंवा सातबारा,आधार बँक पासबुक या आवश्यक कागदपत्राची पूर्तता संबंधित गावातील ग्रामसेवक किंवा ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्याकडे करावेत.घरकुल यादीत दिलेल्या लाभार्थ्यांनी नियमाप्रमाणे कागदपत्रे ऑनलाइन प्रणाली मार्फत करून घ्यावेत म्हणजे लाभार्थ्यांच्या खात्यात घरकुलाचा हप्ता वितरण जमा होण्यास सुलभ जाईल.

आवश्यक त्या कागदपत्राची पूर्तता करून ऑनलाईन करावेत या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
शनिवार, दि.१४ जुन २०२५ । पान ७

# पुण्याला लागले वारीचे वेध; वैष्णवांच्या मेळ्यासाठी शहर होतंय सज्ज, अतिरिक्त आयुक्तांनी केली पाहणी

पुणे । प्रतिनिधी

**लवकरच आषाढी वारीचा सोहळा होणार आहे. यासाठी पुण्यासह पालखी मार्गावर जोरदार तयारी केली जात आहे. वैष्णवांच्या या मेळ्यामध्ये लाखो वारकरी अगदी भक्ती भावाने सहभागी होतात. या पायी वारी करणाऱ्या पांडुरंगाच्या वारकऱ्यांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची काळजी घेतली जात आहे. वारकऱ्यांना देण्यात येणाऱ्या सुविधांचा घेतला आढावा घेण्यात आला आहे. सर्व संबधित विभागांनी वारी दरम्यान आपापसांत समन्वय राखावा अशा सूचना अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी दिल्या आहेत.**



जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांची पालखी १९ जून रोजी तर संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी २० जून रोजी पिंपरी चिंचवड शहरात येणार आहे. या सोहळ्याच्या स्वागतासाठी पिंपरी चिंचवड महापालिका सज्ज असून पालखी मार्गावर, मुक्कामाच्या ठिकाणी तसेच वारकऱ्यांना पुरविण्यात येणाऱ्या सोयीसुविधांची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी दिली. जगद्गुरु संत तुकाराम महाराज आषाढीवारी पालखी सोहळा स्वागत कक्ष आणि मुक्कामाच्या स्थळाची, तसेच पालखी मार्गाची पाहणी अतिरिक्त आयुक्त खोराटे यांनी केली. या पाहणी दौऱ्यावेळी सह शहर अभियंता बापू गायकवाड, देवन्ना गट्टूवार, आरोग्य विभागाचे उपायुक्त सचिन पवार, उद्यान विभागाचे सहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे तसेच संबंधित विभागांचे अधिकारी, कार्यकारी अभियंता, उपअभियंता आणि कर्मचारी उपस्थित होते.

अतिरिक्त आयुक्त खोराटे यांनी 'पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने आषाढीवारी पालखी सोहळ्यासाठी देण्यात येणाऱ्या सेवा सुविधांमध्ये कोणत्याही प्रकारची कमतरता राहणार नाही, याची दक्षता संबंधित विभागांनी घ्यावी. सर्व विभागांनी समन्वयाने वारकऱ्यांना पुरविण्यात येणाऱ्या सोयीसुविधांचे नियोजन करावे. पालखी मुक्कामाच्या ठिकाणी आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून द्याव्यात. पावसाळ्याच्या अनुषंगाने आपत्ती व्यवस्थापनासाठी लागणारी यंत्रणा सज्ज ठेवावी. पिण्याचे पाणी, तातडीच्या वैद्यकीय सुविधा, वारकरी निवास आणि पालखी मार्गावर पुरेशा प्रमाणात फिरत्या शौचालयांची व्यवस्था करावी,' असे निर्देश संबधित अधिकाऱ्यांना पाहणी दौऱ्यादरम्यान दिले.

जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे स्वागत करण्यासाठी महापालिकेच्या वतीने निगडी येथील भक्ती शक्ती याठिकाणी स्वागतकक्ष उभारला जातो. येथे करण्यात येणाऱ्या व्यवस्थेबद्दलची माहिती पाहणीदरम्यान अतिरिक्त आयुक्त खोराटे यांनी घेतली. पालखी मार्गावर पावसाचे पाणी कोठेही तुंबणार नाही, याचीही दक्षता घेण्याबाबत सूचनाही त्यांनी संबधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. यामुळे पुण्यामध्ये पालखी सोहळा असताना कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही याची काळजी घेतली जाणार आहे.

# दुर्दैवी ! धानोरे येथे विषबाधेने २६ शेळ्या-मेंढ्यांचा मृत्यू

आळंदी । प्रतिनिधी

आळंदी जवळच्या धानोरे फाटा भागात विषबाधा झाल्याने मेंढपाळाच्या २६ शेळ्या-मेंढ्या दगावल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. येथील कंपनीतून लगतच्या शेतात मिसळणारे केमिकल मिश्रित पाणी पिल्याने विषबाधा होऊन या शेळ्यामेंढ्या दगावल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. अद्याप विषबाधेचे नेमके कारण समजू शकलेनाही. मयत शेळ्या मेंढ्यांचे पोस्टमार्टम करून ब्लड व ऑर्गन सॅम्पल घेऊन ते तपासणीसाठी पाठवण्यात आले आहे. त्याचा अहवाल आल्यावरच मृत्यूचे खरे कारण समजू शकेल, अशी माहिती आळंदी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक भीमा नरके यांनी दिली.

याबाबत सविस्तर माहिती अशी मेंढपाळ संतोष मारुती ठोंबरे हे आपल्या दोनशे मेंढ्यांच्या कळपासह गुरुवारी (दि.१३) दुपारच्या सुमारास मरकळ रस्त्याने आळंदीच्या दिशेने प्रवास करत आले. या दरम्यान धानोरे फाट्यावर मेंढ्या अधिक वेळ लगतच्या शेतात चरल्या. धानोरे फाट्यावरच त्यांनी रात्रीची पाल टाकली. यादरम्यान मेंढ्यांना त्रास होऊ लागल्याने त्यांनी मरकळ पशुवैद्यकीय दवाखान्यात धाव घेतली. मात्र, येथील डॉक्टरांनी मी बाहेर असल्याचे सांगितले. त्या नंतर ठोंबरे यांनी मेडिकलमधून औषधे घेत प्राथमिक उपाय केला. मात्र, रात्रीच्या सुमारास २६ मेंढ्या दगावल्या अजूनही ८ मेंढ्या अत्यवस्थ असल्याचे ठोंबरे यांनी सांगितले. मेंढ्या चरवेल्या भागात एक कंपनी आहे. या कंपनीचे केमिकल मिश्रितपाणी लगतच्या शेतात येत असते. ते प्रदूषित आहे. हेच पाणी या मेंढ्या पिल्याने त्यांचा विषबाधा



होऊन मृत्यू झाला असावा. या केमिकल मिश्रित पाण्याबाबत मी अनेकदा ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, प्रदूषण नियंत्रण मंडळ आदी ठिकाणी तक्रार केली आहे. मात्र, कारवाई झाली नाही. दरम्यान मयत शेळ्यांमध्ये चार ते पाच बोकड आहेत. त्यांना ईदला कुर्बानीला मागत होते मात्र विकले नाहीत, असे ठोंबरे यांनी सांगितले. आता त्या बोकडांचा मृत्यू झाल्याने ठोंबरे यांचे लाखोंचे नुकसान झाले.



# तू खूप छान दिसतेस; पुण्यात संस्थाचालकडून महिला मॅनेजरचा विनयभंग, मनसे आक्रमक

पुणे । प्रतिनिधी

मनसेच्या विद्यार्थी सेनेकडून आज पुण्यातील बावधन परिसरात असणाऱ्या रामचंद्र इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटचे चेअरमन सूरज शर्मा याच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत आंदोलन केलं. या संस्थेचे चेअरमन असलेल्या शर्मावर बावधन पोलिस ठाण्यात महिलेची छेडछाड केल्याप्रकरणी गुन्हा दाखल आहे. संस्थेत काम करणाऱ्या एका महिलेने शर्माच्या विरोधात तक्रार दिली होती. तक्रारदार महिला ही त्याच संस्थेत काम करत असून शर्माने तिला अनेक वेळा टोमणे मारले.

फिर्यादीत दिलेल्या माहितीनुसार, मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात शर्माने त्या महिलेला तू खूप छान दिसतेस असे म्हणत तिचा हात पकडून तिला ओढून तिची छेड काढली. याप्रकरणी बावधन पोलिस ठाण्यात या महिलेने तक्रार दिल्यानंतर शर्मा याच्या विरोधात गुन्हा दाखल केला. मात्र गुन्हा दाखल असून सुद्धा शर्माला अटक का केली नाही हा जाब विचारण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेकडून आज आंदोलन करण्यात आले. या आंदोलनावेळी शर्मा विरोधात घोषणाबाजी करत मराठी महिलेवर अत्याचार करणाऱ्या परप्रांतीय सूरज शर्माला अटक झालीच पाहिजे अशी मागणी आंदोलकांनी केली

# तेरा वर्षांच्या संसारानंतर जोडप्याचा परस्पर संमतीने घटस्फोट

## वडिलांकडे मुलांचा ताबा

पुणे । प्रतिनिधी

दोघांचा तेरा वर्षांचा संसार. कायमच दोघांमध्ये मतभेद व्हायचे. अखेर दोघांनीही एकमेकांच्या संमतीने विभक्त होण्याचा निर्णय घेतला. पुण्यातील कौटुंबिक न्यायालयाने या दाम्पत्याच्या परस्पर संमतीने दाखल झालेल्या घटस्फोट अर्जास मंजुरी दिली. विशेष म्हणजे, या प्रकरणात मुलांचा ताबा वडिलांकडे सोपवण्यात आला.

राकेश आणि स्मिता (नावे बदललेली) यांचा विवाह २०१० साली झाला होता. संसाराच्या पहिल्या काही वर्षांत सर्व काही सुरळीत होते. त्यांना दोन अपत्ये झाली. मात्र, काही वर्षांपासून दोघांमध्ये मतभेद वाढत गेले. संवाद कमी होत गेला, कुरबुरी वाढत गेल्या. वाद वाढत गेल्याने डिसेंबर २०२३ पासून त्यांनी वेगळे राहण्यास सुरुवात केली.

वेगवेगळे राहूनही मतभेद मिटण्याची शक्यता दिसली नाही. त्यामुळे त्यांनी समुपदेशन आणि परस्पर सल्ल्याने कायदेशीररीत्या घटस्फोट घेण्याचा निर्णय घेतला. त्यांनी हिंदू विवाह अधिनियम, १९५५ अंतर्गत कलम १३(ब) अन्वये परस्पर संमतीने घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला. न्यायालयाने दोन्ही बाजू ऐकून घेतल्या आणि घटस्फोट मंजूर केला. पतीच्या वतीने ड. गायत्री कांबळे यांनी बाजू मांडली.

# जोराचा पाऊस म्हणून कडेला थांबले; अचानक वीज पडून शेतकऱ्याचा मृत्यू, दौंड तालुक्यातील घटना

केडगाव: दौंड तालुक्यातील बोरीपार्धी (ता दौंड) येथील संजय जगन्नाथ जगताप (वय ५५) यांच्यावर वीज कोसळून मृत्यू झाला आहे. जगताप यांच्या गट नंबर १६८/२ या क्षेत्रात शेत काम चालू होते. त्यांच्या शेतामध्ये फ्लॉवर पीक होते. या पिकाची तोडणी शेतीमध्ये चालू होती. मजुरांचे व कुटुंबातील सदस्यांचे शेतामध्ये काम सुरू होते. सायंकाळी पाचच्या सुमारास जगताप हे आपल्या मुलांना मोटरसायकल वरून शेतातील काम आटपुन सोडायला गेले होते.



रस्त्यात थोडे पावसामुळे बाजूला थांबले होते. अंगावर पावसापासून संरक्षण व्हावे म्हणून प्लास्टिकचा कागद घेऊन उभे राहिले होते. इतक्यात विजेच्या कडकडाटासह जोराचा पाऊस सुरू झाला. अचानक त्यांच्यावर वीज कोसळली असे परिसरातील नागरिकांनी सांगितले. वीज कोसळल्यानंतर मगर मळा येथील डांबरी रस्त्यावर सुमारे १ ते दीड फुटाचा खड्डा पडला आहे. जगताप यांच्या पश्चात पत्नी दोन मुले एक मुलगी भाऊ भाऊजी आई वडील असा परिवार आहे. परिसरातील शेतकरी या घटनेने भयभीत झालेले आहेत. याच परिसरातील दोन ऊसतोड कामगारांच्या वस्तीत असलेल्या नारळाच्या झाडावर देखील कालच दिनांक १२ रोजी वीज कोसळली होती. विजेमुळे नारळाच्या झाडाने व या कामगारांच्या झोपडीने पेट घेतला. त्यामध्ये कामगारांचे दोन चिमुकले भाजले. सुदैवाने दोन्हीही चिमुकले बचावले आहेत. त्यांच्यावर केडगाव येथील खाजगी रुग्णालयात उपचार चालू आहेत. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी सदर घटनास्थळी भेट दिली. जोराचा वारा असल्यानंतर सुरक्षित आडोशाला उभे राहावे. तसेच परिसरातील नागरिकांनी काळजी घ्यावी असे आवाहन दौंडचे तहसीलदार अरुण शेलार यांनी केले आहे.

# कात्रजमध्ये भरधाव कारच्या धडकेत तरुणीचा मृत्यू, चालकाला अटक

पुणे । प्रतिनिधी

कात्रजमधील सुखसागर नगर परिसरात यशश्री सोसायटीसमोर आज (शुक्रवारी) दुपारी २:१५ वाजेच्या सुमारास झालेल्या भीषण कार अपघातात श्रेया गौतम येवले (वय २१, रा. शीतल हाईट्स, खंडोबा मंदिराजवळ, कोंढवा, पुणे) या तरुणीचा जागीच मृत्यू झाला. भरधाव टुरिस्ट वॅगन आर कारने (क्र. एमएच १२ यु. एम. ४८४७) फुटपाथवर चालणाऱ्या श्रेयाला जोरदार धडक दिली, ज्यामुळे हा दुर्दैवी प्रसंग घडला.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कार चालक सतीश गुरुनाथ होनमाने (वय ३७, रा. गोकुळ नगर) मुख्य रस्त्यावरून फुटपाथवर घुसला. यावेळी कार नारळाच्या झाडाला धडकून समोर असलेल्या बदामाच्या झाडात अडकली. झाड आणि कारच्या मध्ये सापडून श्रेयाचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच भारती विद्यापीठ, बिबवेवाडी आणि कोंढवा पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी ससून रुग्णालयात पाठवला. चालक सतीश होनमाने याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू आहे.

या घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी गर्दी करून संताप व्यक्त केला. वाहनचालकावर कठोर कारवाईची मागणी स्थानिकांनी केली आहे. नुकताच गंगाधाम चौकात एका महिलेचा अपघातात मृत्यू झाला होता. त्यानंतर अवघ्या काही तासांत पुन्हा कात्रजमध्ये घडलेल्या या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीती आणि रोष निर्माण झाला आहे. स्थानिकांनी रस्त्यांवरील वाहतूक नियंत्रणासाठी अधिक कठोर उपाययोजनांची मागणी केली आहे.

# महापालिका राबविणार स्वच्छ पुणे अभियान; महापालिका आयुक्तांचा पुढाकार

पुणे । प्रतिनिधी

पुणे महानगरपालिका स्वच्छ पुणे अभियान राबविण्याच्या दृष्टीने आता स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने व्यापक जनजागृती करणार आहे. नागरिकांचा सक्रीय सहभाग वाढवून शहरात स्वच्छतेचे सातत्य टिकवून ठेवण्यासाठी महापालिकेने विविध स्वयंसेवी संस्थांसोबत बैठक घेतली.



नवनियुक्त महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी या उपक्रमासाठी पुढाकार घेतला असून त्याची अंमलबजावणी लवकरच सुरू केली जाणार आहे. अतिरिक्त आयुक्त एम.जे. प्रदीप चंद्रन (ज), पृथ्वीराज बी.पी. (इ), ओमप्रकाश दिवटे (वि), तसेच घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त संदीप कदम उपस्थित होते. या अभियानांतर्गत शहरातील कचरा वर्गीकरणाचे प्रमाण १०० टक्के करणे, होम कंपोस्टिंग वाढवणे, बल्क वेस्ट जनरेटर्समार्फत कचरा प्रक्रिया, वस्ती पातळीवर जनजागृती करणे, शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवणे, दृश्यमान स्वच्छता यासारख्या मुद्द्यांवर सखोल चर्चा करण्यात आली. बैठकीस या बैठकीस रोटरी क्लब, इकोएक्झिस्ट, स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्था, पुणे रिटेल असोसिएशन, व्यापारी संघ, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स , पुणेरी नायक, डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, एनएससीसी , यार्दी, पुनरावर्तन, क्रेडाई, ज्वेलर्स असोसिएशन, लोढा फूड प्रॉडक्ट डिलर्स अशा वेगवेगळया संस्थाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी शहराच्या सर्वांगीण स्वच्छतेसाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक असून, स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून हा सहभाग वाढवण्याचे महापालिका नियोजन करणार आहे. या मोहिमेस सर्व स्तरांतून सहकार्य मिळावे, असे आवाहन महापालिका आयुक्त राम यांनी सर्व उपस्थितांना केले.

# भिगवणकरांना मिळणार नवीन सुसज्ज बस स्थानक; परिवहनमंत्र्यांनी केली बस स्थानकाची पाहणी

भिगवण : इंदापूर तालुक्यातील भिगवण येथील बस स्थानकाची अतिशय दयनीय अवस्था झालेली होती. याबाबत अनेक वृत्तपत्रांमध्ये आवाज उठवण्यात आला होता. याची दखल राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतली. भिगवण बसस्थानकास भेट देऊन या बस स्थानकाची पाहणी केली व पावसाळा संपल्यानंतर या बस स्थानकाच्या कामास सुरुवात करण्यात येणार असल्याचे आश्वासन त्यांनी भिगवणकरांना दिले. यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेला भिगवणमधील बस स्थानकाचा प्रश्न सुटण्याचा मार्ग मोकळा झालेला आहे.




इंदापूर तालुक्याचे प्रवेशद्वार समजल्या जाणाऱ्या भिगवण बस स्थानकाची अतिशय दयनीय अवस्था झालेली होती, हे बसस्थानक अक्षरशः मोडकळीस आलेले होते. रात्री-अपरात्री प्रवाशांची खूप गैरसोय होत होती. गेल्या अनेक वर्षांपासून हा प्रश्न प्रलंबित होता. राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी या खात्याचा पदभार स्वीकारल्यापासून राज्यातील सर्व बस स्थानकांची ते पाहणी करत आहेत. त्यांनी भिगवण या ठिकाणी भेट देऊन संबंधित अधिकाऱ्यांना या बसस्थानकाच्या संदर्भात सूचना दिल्या.

# ब्रेक दाबताच कंटेनरमधील लोखंडी रॉड केबिनमध्ये घुसून ड्रायव्हर जागेवरच गतप्राण, अंगावर काटा आणणारं दृश्य

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील चांदणी चौकात पुन्हा एकदा भीषण अपघाताची घटना घडली असून, एका कंटेनर ट्रकला मोठा अपघात झाला आहे. या ट्रकमध्ये बांधकामासाठी वापरले जाणारे मोठ्या प्रमाणावर लोखंडी रॉड्स होते. या अपघातात ट्रक चालकाचा जागीच मृत्यू झाला असून, क्लीनर गंभीर जखमी झाला आहे. जखमीला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाला असून यामुळं चौकात मोठी वाहतूक कोंडीही निर्माण झाली आहे.




ही घटना मुंबईकडे जाणाऱ्या मार्गावर घडली. ट्रक मध्ये असलेले लांब लोखंडी रॉड्स योग्य प्रकारे बांधले गेले नव्हते. ट्रक चालकाने अचानक ब्रेक मारताच, मागील बाजूला असलेले रॉड्स जोरात पुढे सरकले आणि थेट ड्रायव्हरच्या केबिनमध्ये घुसले. यामध्ये चालक जागीच ठार झाला, तर क्लीनर गंभीर जखमी झाला आहे. . ट्रक हे लांब लोखंडी रॉड्स घेऊन ते चांदणी चौकातून मुंबईच्या दिशेने निघाला होती. यावेळी अचानक ब्रेक दाबल्यानं यातील सळया किंवा लोखंडी बार हे थेट ड्रायव्हरच्या केबिनमध्ये घुसले. यामध्ये ड्रायव्हरचा जागीच मृत्यू झाला. या अपघाताचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. व्हिडिओमध्ये दिसते की, ट्रक मध्ये भरलेल्या लोखंडी रॉड्स केबिनमध्ये आरपार गेले आहेत. अपघात होताच काही नागरिक आणि स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेतली आणि अडकलेल्या व्यक्तींना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, रॉड्स इतके मोठे आणि जड होते की त्यांना हलवणे देखील कठीण झाले होते.

अपघाताची माहिती मिळताच पोलीस आणि अग्निशमन दलाच्या टीम तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. युद्धपातळीवर बचावकार्य सुरू केलं, अडकलेल्या व्यक्तीला बाहेर काढण्यात आले. दरम्यान, या अपघातामुळे परिसरात प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. वाहतूक पोलिसांकडून वाहतूक सुरळीत केली. हा अपघात ट्रकमध्ये लोखंडी रॉड्स ठेवताना असलेली निष्काळजीपणा आणि वाहतूक सुरक्षिततेच्या नियमांकडे केलेले दुर्लक्ष यामुळे झाला असावा, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. पोलिसांनी घटनेचा तपास सुरू केला आहे.

# निमोणे ग्रामस्थांची संवेदनशीलता: थोरात कुटुंबाला १.३२ लाखांची आर्थिक मदत

शिरूर । प्रतिनिधी

शिरूर तालुक्यातील निमोणे येथील हॉटेल व्यावसायिक बाळासाहेब रंगनाथ थोरात यांचा ९ जून रोजी करडे (ता. शिरूर) येथे अपघाती मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेने थोरात कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. अशा कठीण प्रसंगी निमोणे ग्रामस्थ आणि नातेवाइकांनी थोरात कुटुंबाला धीर देत आर्थिक मदत उभी केली.



निमोणे गावातील काही सोशल मिडिया ग्रुप्सच्या माध्यमातून ग्रामस्थांनी आर्थिक मदतीचे आवाहन केले होते. याला उदंड प्रतिसाद देत गावकऱ्यांनी माणुसकी दाखवत ऑनलाइन आणि रोख स्वरूपात १ लाख ३२ हजार ६४० रुपयांची मदत गोळा केली. दशक्रिया विधीच्या वेळी बाळासाहेब यांचे पुत्र चेतन आणि शुभम थोरात तसेच पोपळघट कुटुंबाने ग्रामस्थ आणि नातेवाइकांचे आभार मानले. तुमच्या साथीने आम्हाला सावरण्याचे बळ मिळेल, अशा भावनिक शब्दांत त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. थोरात कुटुंबाने या मदतनिधीचा गरजेपुरता आणि योग्य वापर करण्याची ग्वाही दिली आहे. ग्रामस्थांच्या या संवेदनशील कृतीमुळे निमोणे गावाच्या सामाजिक एकतेचे दर्शन घडले. ही घटना परिसरात चर्चेचा विषय ठरली असून, संकटकाळात गावकऱ्यांनी दाखवलेल्या माणुसकीचे सर्वत्र कौतुक होत आहे.